# हाकारा

वर्ष सोळावे • अंक तिसरा

जुलै - सप्टेंबर १९९५



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. *प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| उपाध्यक्ष | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | या अंकाविषयी | | २ |
| ◆ | कुपोषणाच्या बळींचा प्रश्न | | ३ |
| ◆ | जव्हार मोखाड्यातील अनेक बालके कुपोषणग्रस्त | | ४ |
| ◆ | धुळे जिल्ह्यातील कुपोषण | : रमाकांत पाटील | ५ |
| ◆ | कविता - पेज आंबील | : जनार्दन पाटील | २१ |
| ◆ | कविता - कुपोषण | : पुरूषोत्तम आगाशे | २२ |
| ◆ | कुपोषण थांबविण्यासाठी कृती आराखडा | | २३ |
| ◆ | खडकीतील आश्रमशाळा, वनतळ्याचे काम सुरू | | २४ |
| ◆ | आदिवासी आणि बांडगुळे | | २५ |
| ◆ | व्यंगचित्र | : पुरूषोत्तम आगाशे | २६ |
| ◆ | आता नको हुंदके अन् अश्रुही | | २७ |
| ◆ | कुपोषण : समस्या आणि उपाय | : पुरूषोत्तम आगाशे | २९ |



वर्ष सोळावे : अंक -तिसरा
जुलै - सप्टेंबर १९९५

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**चित्रकार व संपादन सहाय्य**
पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रू. १५/-**

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे ३०.



अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## या अंकाविषयी....

*'हाकारा' चा यावेळचा विशेषांक 'कुपोषण' या विषयावर काढण्यात आला आहे. कुपोषण हा विषय आपल्याला नविन नाही. धुळे, अमरावती, ठाणे हे आदिवासी जिल्हे कुपोषणाने होणाऱ्या बालमृत्युंमुळे सतत प्रकाशझोतात असतात. वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या बातम्यांमुळे सर्व सामान्यांच्या मनात या विषयीचे कुतुहल निर्माण होत असले तरी 'कुपोषण' म्हणजे नेमके काय? हे माहीत नसते. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे.*

*या अंकात धुळे जिल्ह्यातील कुपोषणामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची व परिणामांची रमाकांत पाटील यांनी सविस्तर मीमांसा केली आहे. तसेच पुरूषोत्तम आगाशे यांनी कुपोषण म्हणजे नेमके काय? याची शास्त्रीय दृष्टीकोनातून अतिशय सोप्या भाषेत सर्वसामान्यांना माहिती करून दिली आहे. कुपोषणासंदर्भात वृत्तपत्रांतून आलेल्या बातम्या या विषयाचे गांभीर्य दाखवून देतात.*

*हा अंक सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन व सर्वसामान्यांना माहितीपूर्ण ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.*

**- संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# कुपोषणाच्या बळींचा प्रश्न

धुळे जिल्ह्याच्या अक्राणी व अक्कलकुवा तालुक्यांत कुपोषण व गोवरामुळे अठ्ठावीस बळी पडल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचे आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर आणि आदिवासी विकास मंत्री गोविंदराव चौधरी यांच्यात सुरू झालेली जुगलबंदी रोज नवनव्या विसंगतीचे दर्शन घडवीत आहे. डॉ. आहेर यांनी हे बळी अठ्ठावीस नसून चार आहेत असे सांगितले, तर चौधरींनी आधीची बळींची संख्या आपण सांगितलीच नव्हती असे म्हणून ती सहा असल्याचे सांगितले. शासकीय पातळीवर या संदर्भातील वेगवेगळी आकडेवारी वेळोवेळी सांगण्यात आलेली आहे. याचा अर्थ आकड्यांचे खेळ करण्यात ही मंडळी मशगुल आहेत. मूळ प्रश्नाचे गांभीर्य त्यांना जाणवत नाही. आदिवासींच्या कुपोषणाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आदिवासी पाड्यांचे पुर्नवसन करण्याची योजना डॉ. आहेर यांनी सुचवली आहे, तर ही कल्पना पूर्णत: अव्यवहार्य असल्याचे श्री. चौधरी यांनी म्हटले आहे. श्री. चौधरी हे आदिवासी भागातून आलेले असल्यामुळे आदिवासींची मानसिकता ते जाणतात. पुनर्वसन करून चाळवजा वस्त्यांतून आदिवासी राहतील ही कल्पना प्रत्यक्षात उतरू शकणारी नाही, हे त्यांचे मत रास्तच आहे, मात्र डॉ. आहेर हे आदिवासींना आरोग्यसुविधा पुरविण्यातील अडचणींचाच फक्त विचार करताहेत हे स्पष्ट होते. दुर्गम भागात वैद्यकीय सुविधा पोचविण्यातील अडसर त्यांना खुणावताहेत, परंतु या आदिवासींची परंपरा, स्थावर जंगम मालमत्ता, त्या संदर्भातील त्यांचे विचार आणि परिसरातील भौगोलिक, नैसर्गिक घटकांवरील त्यांची अवलंबितता या बाबी डॉ. आहेर यांनी विचारात घेतलेल्या दिसत नाहीत. दोन मंत्र्यांच्या निवेदनांतील आणि भूमिकांतील फरक हा त्यांचे संबंधित प्रश्न आणि परिस्थिती या विषयीचे ज्ञान व समज यांच्याशी निगडित आहे. त्यानुरूप व्यक्ती म्हणून विचार वेगवेगळे विचार संभवत असले, तरी सरकारचे घटक म्हणून वावरताना अशी निवेदने जाहीर करणे हे पोरकटपणाचे व बेजबादारपणाचे आहे. शासन म्हणून एक निश्चित भूमिका घेऊन त्यांनी जनतेसमोर यावयास हवे.

आदिवासींचे कुपोषण हा प्रश्न नवा नाही, गोवर, अतिसार आदींसारख्या एरवी साध्या औषधोपचाराने आटोक्यात येऊन शकणाऱ्या व्याधी येथे मोठ्या प्रमाणावर मृत्यूकांड घडवितात. याचे मुख्य कारण कुपोषण, अज्ञान, सुविधांचा अभाव व दारिद्र्य अशा स्वरूपात सांगता येईल. स्वाभाविकच अशा रोगराईत सर्वाधिक बळी हे बालकांचे पडतात. यापूर्वी १९८७,१९८९,१९९२ मध्ये असे प्रकार घडले तेव्हा शासकीय अधिकाऱ्यांनी, मंत्री, मुख्यमंत्री, आदींनी या दुर्गम आदिवासी भागाला भेट दिली होती. काही उपाययोजना जाहीर केल्या होत्या. मात्र तरीही अद्याप या भागात कुपोषणाचे बळी पडतच आहेत. परंतु त्याचे गांभीर्य कोणालाही वाटू नये ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

श्री. शरद पवार तसेच श्री. सुधाकर नाईक या दोघांनीही आपापल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात ठाणे व धुळे जिल्हयांतील कुपोषणाची समस्या कायमस्वरूपी सोडवण्याकरिता काही उपाययोजना जाहीर केल्या होत्या. प्राधान्य तत्त्वावर सुलभ दळणवळण सुविधा, वैद्यकीय सेवांची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा आदि बाबींसारख्या तरतुदी केल्या गेल्या होत्या. प्रत्यक्षात या सुविधा आदिवासींपर्यंत पोचल्या नाहीत हे ताज्या

(पान २० वर)

# जव्हार-मोखाड्यातील अनेक बालके कुपोषणग्रस्त

जव्हार मोखाडा तालुक्यात आदिवासींच्या विकासासाठी तीन वर्षापूर्वी अनेक योजना आखूनही त्यांची अधिकाऱ्यांनी नीट अंमलबजावणी न केल्याने जव्हार-मोखाडा आणि वाडा तालुक्यात एकूण ८२९ बालके कुपोषणग्रस्त असल्याची खंत आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांनी आज जव्हार येथे झालेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत व्यक्त केली.

धुळे जिल्ह्यातील आदिवासी बालकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यात कोठेही आदिवासी बालकांचा मृत्यू होऊ नये, म्हणून राज्य सरकारने काळजी घेण्यास सुरवात केली आहे. आदिवासी विकासमंत्री गोविंदराव चौधरी यांनी गेल्या रविवारी जव्हार-मोखाडा-शहापूर तालुक्याचा दौरा केल्यानंतर आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर, अन्न आणि नागरी पुरवठामंत्री शोभाताई फडणवीस, गोविंदराव चौधरी आणि पालकमंत्री साबीर शेख यांनी आज सकाळी जव्हार येथे भेट दिली. त्या वेळी अधिकाऱ्यांच्या बैठकीत आदिवासी विकास योजनांचा त्यांनी आढावा घेतला.

"१९९२-९३ मध्ये जव्हार-मोखाडा आदिवासी तालुक्यात अनेक बालके मृत्युमुखी पडल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. परंतु, त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्ष न होता फक्त कागदोपत्री झाल्याची बाब दु:खाची आहे. या योजना प्रत्यक्ष राबविल्या नसल्याने २९ बालके कुपोषित असल्याचे आढळून आले नसते", असे सांगून श्री. आहेर म्हणाले, की "राज्यात सत्तांतर झाले असून, त्याची दखल अद्याप अधिकाऱ्यांनी घेतलेली दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या वागणुकीत आणि कामात पूर्वीपेक्षा जास्त फरक पडलेला दिसत नाही. अधिकाऱ्यांना सत्तांतराची जाणीव होऊन त्यांनी अधिक सतर्क राहावे आणि जनतेची कामे करण्यास सुरवात करावी, या उद्देशाने चार मंत्र्यांचा संयुक्त दौरा आयोजित करण्यात आला आहे. पावसाळ्यात वा पावसाळ्यानंतर साथीचे रोग होणार नाहीत, याची सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे. टी.सी. एल. ही पाणी शुद्ध करण्याची पावडर लवकर खराब होत असल्याचे ती छोट्या पॅकेटमधून पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला. येथील आदिवासींना उपजीविकेचे साधन नसल्याने कुपोषण होत आहे. ते थांबविण्यासाठी रोजगार हमी योजनेवर येणाऱ्यांना निम्मे धान्य आणि निम्मे पैसे देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे." ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील सरकारी काम समाधानकारक नाही. येथील कामे फक्त कागदावरच झाली आहेत. यापुढे समाधान देणारी कागदावरील कामे चालणार नाहीत, याची अधिकारीवर्गाने दखल घ्यावी. ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेला सर्व प्रकारचे साह्य मिळेल; परंतु डॉक्टरांनी आपल्या कामात हलगर्जीपणा केलेला खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

आदिवासी भागात मिनी अंगणवाड्यांवर भर देण्याचा आणि अंगणवाड्यांत काम करणाऱ्या सेविकांचे अनुदान वाढविण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी विकासमंत्री गोविंदराव चौधरी यांनी सांगितले, की ठाणे जिल्ह्यात गवत खरेदी योजना राबविणे आवश्यक असून, ती आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवावी, की जंगल कामगार सहकारी संस्थांमार्फत राबवावी याचा विचार केला जात आहे. गेल्या आठवड्यात मी केलेल्या दौऱ्यात वनविकास

(पान २० वर)

# धुळे जिल्ह्यातील कुपोषण

**- रमाकांत पाटील**

धुळे जिल्हा अनेक कारणांनी सातत्याने गाजत आलेला आहे. अरूण भाटिया यांनी खणून काढलेले नवापूर तालुक्यातील बोगस जंगल मजूर साह्याचे प्रकरण वा बहुचर्चित भास्कर वाघ भ्रष्टाचाराचे प्रकरण असो, हा जिल्हा सातत्याने प्रसिद्धिच्या झोतात राहिला आहे. सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या पुनर्वसन प्रकरणामुळे धुळे जिल्हा तसा जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाला, तोही पुनर्वसनातील अनियमितता आणि भ्रष्टाचारामुळे. एप्रिल व मे १९८७ मध्ये जिल्ह्यातील सातपुड्याच्या गिरीकंदरात राहणाऱ्या आदिवासींच्या १४१ बालकांच्या कुपोषणामुळे झालेल्या मृत्यूने हा जिल्हा पुन्हा प्रकाशात आला होता. याबरोबरच रेशन, रॉकेलचा भ्रष्टाचार आदि अनेक कारणांनी हा जिल्हा कुप्रसिद्ध झाला आणि त्यातच सध्या सुरू असलेल्या सातपुड्यातील गोवर आणि कुपोषणामुळे हा जिल्हा पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या झोतात आला. वास्तविक सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात कुपोषण आणि साथीला बळी पडणे ही काहि नवी बाब नाही. १९८७ मध्ये अक्कलकुवा तालुक्यातील बामणी या अतिदुर्गम भागात कुपोषणाने १४१ बालकांच्या बळी गेला होता. त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी तेथे भेट दिली होती. त्या वेळी त्यांनी, शरमेने मान खाली जाते, असे उद्‌गार काढून आदिवासींना सहानुभूतीचा दिलासा दिला होता. त्यानंतर पुन्हा १९८९ मध्ये अक्कलकुवा तालुक्यातील वडफळी परिसरात गोवर आणि जुलाबाने सुमारे ५१ बालकांचा बळी गेला होता. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्या भागाला भेट दिली व आदिवासी अतिदुर्गम भागाच्या विकासाकरिता विशेष कृती कार्यक्रम घोषित केला. त्यानंतरदेखील कुपोषणामुळे बळी या आदिवासी क्षेत्रात जात राहिले. 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर सातत्याने अतिदुर्गम भागात दरवर्षी होणाऱ्या कुपोषणाच्या बळींची माहिती देतच राहिल्या आणि यावर आरोग्य विभाग आणि महसूल विभागाने परस्परांना दोष देण्यापलीकडे कोणतेही काम केले नाही. अतिसारासारख्या किरकोळ साथीनेच बालकांचे बळी जात राहिले. आताच एप्रिल ९५ मध्ये तोरणमाळ परिसरात अतिदुर्गम भागात गोवर व कुपोषणाने सुमारे ३० मुले मृत्युमुखी पडल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे; तर जिल्हा प्रशासनाच्या आरोग्य विभागाने फतवा काढून गोवरने केवळ चारच मुले दगावल्याचे घोषित करून सारवासारव केली आहे.

याबाबत राज्याचे आदिवासी विकासमंत्री गो.शि. चौधरी, आदिवासी विकास आयुक्त गौतम, सहायक आरोग्य संचालक खेडकर, आमदार डॉ विजय गावत्तत, डॉ. नरेंद्र पाडवी, भारतीय जनता पक्षाचे धुळे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. कांट्रिलाल टाटिया व आरोग्य व वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भागास भेट दिली. वनसंजीवनी योजना, धान्यकोष योजना आदी योजना जाहिर करून आदिवासींचे सांत्वन केले. याच कुपोषणाच्या चौकशीसाठी राज्याचे मुख्य सचिव शरद उपासनी व आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर धुळे जिल्ह्यात आले; पण या अतिदुर्गम भागातील आदिवासींची प्रत्यक्ष भेट न घेता अथवा पाहणी न करताच केवळ जिल्हा ठिकाणाहून माहिती घेऊन रवाना झाले. आता तीच माहिती अधिकृत शासकिय माहिती

म्हणून जाहीर करण्यात येईल. या प्रकरणाची मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनीदेखील गंभीर दखल घेतल्याचे जाहिर झाले. अर्थातच जास्तीत जास्त महिनाभर या कुपोषित आदिवासींबद्दल शासनाला व अधिकाऱ्यांना सहानुभूती राहणार. पुन्हा 'जैसे थे' स्थिती येईल. आदिवासींचे कुपोषण होतच राहणार. काही दिवसानंतर पुन्हा कार्यकर्ता जागृत होईल. शासकीय अधिकारी व मंत्र्यांच्या पुन्हा या भागात भेटी होणार, काही योजना घोषित होणार...आठ दिवसापर्यंत त्या योजनांची कार्यवाही सुरू राहील आणि पुन्हा आदिवासींचे कुपोषणाने बळी जातच राहणार...हे चक्र कधी संपणार, हा मोठा प्रश्न आहे.

आदिवासी क्षेत्रातील भावी पिढी गोवर, अतिसार वा अन्य कोणत्या कारणांनी दगावते आहे, त्यांचा बळी जाऊ नये म्हणून राज्यकर्त्यांनी काय केले, आदिवासींचे कुपोषण थांबवावे व आदिवासींचा विकास व्हावा यासाठी शासनाने यापूर्वी जाहिर केलेल्या योजनांचे काय झाले, हेही प्रश्न अनुत्तरित आहेत. धुळे जिल्ह्यातील सातपुड्यातील पहाडपट्टीत राहणारे आदिवासी कायमस्वरूपीच कुपोषणग्रस्त आहेत. खऱ्या अर्थी या कुपोषणाला जबाबदार कोण आहे, हा एक संशोधनाचा विषय ठरला आहे.

## आदिवासींचे आर्थिक शोषण

धुळे जिल्ह्याच्या उत्तरेला सातपुडा पर्वताच्या रांगा आहेत. या जिल्ह्यातील अक्कलकुवा आणि अक्राणी तालुक्यांतील बहुतांश वस्ती सातपुड्याच्या डोंगरदऱ्यांत आहे. घनदाट जंगलाचा परिसर म्हणून या भागाची ओळख होती. या जंगलावरच वनौपचार करून आदिवासी उदरनिर्वाह करीत होते. १९४७ नंतर तत्कालीन खानदेशचे जिल्हाधिकारी मसूद यांच्या छत्रछायेखाली नसरवानजी नावाच्या पारशी ठेकेदाराने सातुपडा जंगल साफ करण्यास सुरवात केली. हा

### *जंगलचा कायदा*

जंगलाचे करण्यास रक्षण
संमत केला कायदा
झाला वन विभाग स्थापन
पण कोणाचा झाला फायदा?
तोडून नेली मोळी डोक्यावर
तर ठरतो आदिवासी गुन्हेगार
बेकायदा भरून जाते मालमोटार
तरी दुर्लक्षिला जातो ठेकेदार

- पुरूषोत्तम आगाशे

नसरवानजी काही दिवस खापर येथे राहत असे. खापरला त्या इमारतीचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत. या नसरवानजीने चोरटी जंगलसंपत्ती वाहून नेण्यासाठी राजपिपला ते डनेलपर्यंत अतिदुर्गम भागात रस्ता तयार केला होता, जो आजही प्रामाणिकपणे डागडुजी करून वापरता येईल, असा आहे.

सातपुड्यातील जंगल नष्ट करण्यास १९४७ पासून खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाली. वनसंरक्षण आणि वनसंवर्धनाकरिता महाराष्ट्र शासनाचा वनविभाग नावाचा स्वतंत्र विभाग अस्तित्वात आला आणि सातपुडा झपाट्याने ओस पडू लागला. आज सातपुड्यावरील धडगांव, तोरणमाळ परिसरातील जंगलात गोरंब्याचे जंगल सोडले, तर संपूर्ण सातपुड्यात साग सांपडणेही कठीण आहे. धुळे जिल्ह्यात वनविभागाचा विस्तार करून पश्चिम धुळे वनक्षेत्र विभाग अस्त्वित्वात आला. त्यामुळे केवळ अधिकाऱ्यांचा फायदा झाला, वनाचा नाही. जंगलतोड करणारे ठेकेदार, जंगल कामगार मजूर सहकारी सोसायट्या आणि वनविभाग यांनी

सातपुड्यातील वनसंपत्ती राजरोस नष्ट केली. साग, महू, आंबा, बांबू, शिसम, अंजन, बाभूळ या झाडांनी नटलेले हे जंगल पूर्णपणे नष्ट झाले. सहाजिकच या वनावर उपजीविका करणाऱ्या आदिवासींवर कुपोषणग्रस्त होण्याची पाळी आली आहे.

यासंदर्भात १९८४-८५ मध्ये अक्कलकुवा तालुक्यातील सातपुड्याच्या जंगलातील कोळसा ट्रट्यांचे प्रकरण देशभरात गाजले, त्यात मेवासी वनविभागाचे अधिकारी, जंगल नष्ट करणारे मक्तेदार आणि राजकीय पुढारी यांचे घनिष्ट संबंध होते. वृत्तपत्रांनी हे प्रकरण छायाचित्रांसह प्रसिद्ध केले; पण कोणावरही अद्याप कारवाई झाली नाही. कदाचित त्या प्रकाराची चौकशी अकराव्या वर्षीही सुरूच असेल.

एका बाजूने वनसंपत्तीचा नाश होत गेला. त्यामुळे सहाजिकच ज्याच्या जीवननिर्वाहाचे साधनच मुळात वनउपज होते, ते वनवासी अन्य उद्यागांकडे वळले. जंगल नष्ट झाल्यामुळे आदिवासींनी अतिक्रमित जमिनींवर शेती करण्यास सुरवात केली. ही शेती निसर्गावरच अवलंबून असते. जलसिंचनाचा कोणत्याही योजना वनवासी क्षेत्रात राबविण्यात आलेल्या नाहीत. त्यांत आदिवासींनी वनजमिनीवर अतिक्रमण केले म्हणून वनविभागाने आदिवासींचा कायदेशीर आणि बेकायदेशीर मार्गाने छळ सुरू केला. संबधित आदिवासींना अटक करणे, त्यांच्यावर न्यायालयात खटले दाखल करणे आदि प्रकार सुरू केले. यासारख्याच एका प्रकरणात मेवासी वनविभागाने बैलांना अटक करून त्यांना न्यायालयात सादर करण्याचा विक्रम केला आहे. याबरोबरच, बेकायदेशीर मार्गाने तळोदा, शहादा, धडगाव, शिरपूर भागातील वन अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी अतिक्रमित वनजमीनधारकांचे आर्थिक शोषण केले.

सध्या ज्या भागात गोवराची साथ आहे, त्या भागातील अतिक्रमित खेडुतांकडून 'जमीन नावावर करून देतो,' असे सांगून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी वर्षभरापूर्वी लाखो रूपयांची खंडणी वसूल केली. ज्यांनी पैसे देण्यास नकार दिला त्यांचा अमानवी छळ केला. याप्रकरणी आदिवासींनी आंदोलन छेडले. अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होऊन सहा कर्मचाऱ्यांवर तात्पुरती कारवाई केली गेली. अशाच प्रकारे आदिवासींचे शोषण होत राहिले. या आदिवासींना पावसाळ्यापूर्वी जमिनीची मशागत करण्याकरिता, पेरणीकरिता, उत्पन्न काढण्याकरिता, व आलेले उत्पन्न विक्रीसाठी वाहून नेण्याकरिता वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना खंडणी द्यावीच लागते. या सर्व प्रकरणाने वैतागलेल्या आदिवासींना न्याय मिळावा म्हणून तत्कालीन पुलोद सरकारने कायदा केला. त्या कायद्यानुसार,अतिक्रमित वनजमीन धारकांसाठी वैध मानून त्या कालखंडात अतिक्रमित वनजमीनधारक असणाऱ्यांना ती जमीन त्यांच्या नावावर करून द्यावी. पुलोद सरकारच्या पतनानंतर त्या कायद्याची अंमलबजावणी आजतागायत झाली नाही. परिणामी, १९८३ मध्ये या जिल्ह्यातील अतिक्रमित वनजमीनधारकांना सर्वोच्च न्यायालयात खटला दाखला केला. त्याचा निकाल गेल्या महिन्यातच लागला आहे. आता ती कार्यवाही पूर्ण करून संबंधितांना अतिक्रमित वनजमीन नावावर करून देण्याची व्यवस्था होणार की नाही, हा लांबचा प्रश्न आहे. अर्थात, झपाट्याने वन नष्ट झाले आणि वनजमिनीवर अतिक्रमण करू पाहणाऱ्या आदिवासींना शेती करण्यालाही मज्जाव करण्यात आला. त्यांचे आर्थिक शोषण करण्यात आले. धड एका वेळचे जेवणही मिळणे अशक्य झालेले हे आदिवासी कुपोषणाची शिकार होणार नाही तर कशाची होतील?

## आरोग्य सेवांची दुर्दशा

सातपुड्यातील आदिवासींच्या कुपोषणाला जबाबदार असलेला आणखी एक घटक म्हणजे जिल्हा परिषदेची यंत्रणा, शासनाच्या योजना प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोचविणारी यंत्रणा म्हणजे जिल्हा परिषद. त्यामार्फत शिक्षण आरोग्य, शेतीसाहित्य, रस्ते, पाणी आदी सुविधा पुरविल्या जातात. मात्र सातपुड्याच्या अतिदुर्गम भागापर्यंत या सुविधा पुरविण्यास धुळे जिल्हा परिषदेची यंत्रणा अयशस्वी ठरली आहे हे खेदाने नमूद करावे लागते. अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा आणि त्यांच्या भ्रष्ट प्रवृत्तीबरोबरच त्यावर नियंत्रणाचा अभाव, यामुळेच येथील आदिवासींचीही दैना झाली, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

शिक्षण हा मानवी जीवन विकासाचा अत्यावश्यक घटक आहे. पण अतिदुर्गम भागातील आदिवासी क्षेत्रात प्राथमिक शिक्षणाची दैन्यावस्था आहे. जिल्हा परिषदेच्या पिशवी शाळांचे प्रकरण विधानसभेत गाजलेले आहे. मात्र अद्यापही सातपुड्याच्या अक्कलकुवा आणि अक्राणी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील शाळांची अवस्था पिशवी शाळेच्या स्वरूपांत आहे. गेल्या वर्षीच अक्कलकुवा तालुक्यांतील पालकांनी शिक्षक शाळेवर येत नाही म्हणून जिल्हा परिषदेसमोर उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता. आमदार दिलवरसिंग पाडवी यांनीदेखील विधानसभेपर्यंत प्रकरण पोचविले होते. मात्र त्यावर फक्त काही काळ काही शिक्षकांचा पगार थांबवून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही पूर्ण केली व महिन्या दोन महिन्यानंतर पुन्हा तीच अवस्था झाली.

तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी त्यांच्या कारकीर्दीत सातपुड्यातील अतिदुर्गम भागातील प्रत्येक गावात जिल्हा परिषदेची शाळा पोचवली व त्याबरोबरच प्रत्येक एकशिक्षकी शाळेचे रूपांतर बहुशिक्षकी शाळेत केले. यामुळे फक्त शिक्षणावरचा कागदोपत्री खर्च वाढला. प्रत्यक्षात शिक्षक शाळेपर्यंत पोचले नाहीत, ही धुळे जिल्ह्याच्या वनवासी क्षेत्राची स्थिती आहे.

> ### विहीर
>
> पुन्हा सांगतो एकदा
> तो नाही खड्डा साधा
> ती आहे गावची विहीर
> लागले नाही पाणी आजवर
> झाला खूप खर्च नियोजनावर
> आणि कंत्राटदार गबर
> आमची मात्र चालूच वणवण लांबवर
> जगतोय अजूनही
> घडाभर अशुद्ध पाण्यावर
>
> – पुरूषोत्तम आगाशे

जी अवस्था शिक्षणाची आहे तशीच अवस्था आरोग्यसेवेची आहे. धुळे जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र व ४३० उपकेंद्रे सुरू आहेत. याव्यतिरिक्त दहा फिरती पथके कार्यरत आहेत. वनवासी क्षेत्रात आणि त्यातही प्रामुख्याने सातपुड्याच्या दुर्गम भागात असणारी आरोग्य केंद्रे हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. या आरोग्य केंद्रांची रचनाच मुळात चुकीची आहे. केवळ नकाशाचा आधार घेऊन या आरोग्य केंद्रांची रचना केली आहे, त्यामुळे अनेक आरोग्य केंद्रे अशी आहेत की ज्या आरोग्य केंद्रातील अधिकाऱ्यांना प्रामाणिकपणे काम करावयाचे असले तरी त्यांना ते शक्य होत नाही. उदा. सध्या खडकी येथील मृत्यूंमुळे गाजत असलेल्या तोरणमाळ प्राथमिक आरोग्य केंद्राची रचना लक्षात घेतल्यास या आरोग्य केंद्राला तोरणमाळपासून भादल हे नर्मदा किनारपट्टीवरील गाव ते

शहादा-धडगाव रस्त्यावरील काकर्दा हे गाव जोडले आहे. नकाशात हे अंतर खूप कमी असले तरी प्रत्यक्षात भादलला जाण्याकरिता दीड दिवस पायपीट करावी लागते. अन्य मार्ग नाही आणि पावसाळ्यात पायीदेखील जाता येत नाही अशी परिस्थिती आहे म्हसावमार्गे तोरणमाळ ते काकर्दा अंतर सुमारे शंभर किलोमीटर आहे. वास्तविक धडगाव ग्रामीण रूग्णालय व चुलवड प्राथमिक आरोग्य केंद्र काकर्दापासून फक्त तीस किलोमीटरवर आहे. मात्र ते गाव चुलवड आरोग्य केंद्राला न जोडता तोरणमाळ आरोग्य केंद्राला जोडले आहे. अशीच स्थिती इतर ठिकाणीही आहे.

आरोग्य केंद्राच्या रचनेबरोबर तेथे नियुक्त झालेले वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची काम करण्याची वृत्ती हादेखील एक स्वतंत्र विषय आहे. वास्तविक आदिवासी क्षेत्रात बहुतांश ठिकाणी आदिवासी समाजाच्याच वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे. मोजके अपवाद सोडले तर आपल्याच समाजासाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्याची तयारी नसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे. आधीच रिक्त पदे न भरल्याने आधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. आणि त्यातच ही अवस्था. यामुळे आरोग्यसेवेचा जनतेला लाभ होत नाही. आरोग्य केंद्राची आणखी एक चिंताजनक बाब औषधपुरवठा हीही आहे. मुळात औषध खरेदीपासून आरोग्य केंद्रात पोचेपर्यंतच्या कामाला टक्केवारी आणि औषधाच्या दर्जात केलेली तडजोड या बाबी सातत्याने गाजलेल्या आहेत. त्यामुळे आदिवासी भागात एखादी साथ पसरल्यास त्यावर नियंत्रण मिळविण्याकरिता प्रभावी औषधे उपलब्ध असतातच असे नाही. त्यामुळे आरोग्य केंद्राची पुनर्रचना, रिक्तपदी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती, औषधांची अनियमितता नष्ट करणे आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून काम करवून घेणे आवश्यक आहे.

आदिवासींच्या कुपोषणाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्याची आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांची योजना असून यावर आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी यांनी साशंकता व्यक्त केली आहे. कारण आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्याची योजना अतिशय किचकट व संघर्षमय आहे, याची आदिवासी विकासमंत्र्यांना जाणीव आहे. सात मे रोजी त्यांनी या भागाला भेट देऊन याबाबत आदिवासींशीही चर्चा केली आहे. मात्र डॉ. दौलतराव आहेर यांनी त्या भागाला प्रत्यक्ष भेट दिलेली नाही.

सरदार सरोवरामुळे धुळे जिल्ह्यातील तेहेतीस गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या दहा वर्षापासून गाजतो आहे. अद्याप शासनाला त्यात यश आलेले नाही. उलट त्यामुळे झालेली शासकीय यंत्रणेची बदनामी जागतिक स्तरापर्यंत पोचली आहे. वनउपजावर उपजीविका करणारे आदिवासी अनेक पिढ्यांपासून सातपुड्याच्या डोंगरदऱ्यांत स्थायिक झाले आहेत. त्या भागाशी ते एकरूप झाले आहेत. गेल्या काही वर्षात त्या भागातील वन नष्ट झाल्याने हे आदिवासी अतिक्रमित वनजमीन कसू लागले. त्या माध्यमातून वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी त्यांची अधिक लूट, छळ केला. परिणामी, डोंगराळ भागातून बाहेर निघाल्यास याचप्रमाणे लोक आपले छळ करतील, अशी त्यांची समजूत आहे. याबरोबरच सरदार सरोवर प्रकल्पामुळे झालेली प्रकल्पग्रस्तांची अवस्था त्यांच्या डोळ्यासमोर आहे. तसेच आपल्या पिढ्यानपिढ्या याच भूमीवर गेल्या. त्यामुळे आपणही येथेच राहावे, अशा त्यांच्या भावना आपणही येथेच राहावे, अशा त्यांच्या भावना आहेत. यामुळे हे आदिवासी पुनर्वसनाला तयार नाहीत.

आदिवासींचे पुनर्वसन करण्याविषयी आदिवासी विकासमंत्री चौधरी यांनी खडकी येथे एक योजना मांडली, ती म्हणजे पाच-सात पाड्यांतील लोकांनी एकत्र येऊन

राहावे. त्या भागातीलच एका गावठाण जागेवर शासनातर्फे त्यांची राहण्याची व्यवस्था केली जाईल व तेथे सर्व सुविधा पुरविल्या जातील. या ठिकाणीच राहून सध्या त्यांच्याकडे असलेली अतिक्रमित जमीन त्यांनी कसावी. ही योजना यशस्वी होण्यासारखी आहे. कारण याबाबत आदिवासी सहमत होऊ शकतात. किंबहुना याच योजनेवर शासनाने यशस्वितेसाठी जोर देणे गरजेचे आहे.

सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात पिण्याच्या पाण्याची अवस्था तर अतिशय बिकट आहे. नदी-नाल्यांच्या डबक्यांतील अशुद्ध पाण्यावरच आदिवासींना तृष्णा भागवावी लागते व ते मिळविण्यासाठीही डोंगरदऱ्यांतून पाच-सात किलोमीटरची पायपीट करावी लागते. या आदिवासींच्या पाण्याच्या सुविधेसाठी जिल्हा परिषदेतर्फे विहिरी खोदून दिल्या आहेत; तसेच काही ठिकाणी हातपंप बसवले आहेत. मात्र, त्यांचा फायदा आदिवासीऐवजी फक्त संबंधित अधिकारी व ठेकेदाराला झाला. आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी यांनी अतिदुर्गम भागात खडकी (ता. अक्राणी) येथे नुकतीच भेट दिली. तेव्हा गावात प्रवेश करताना त्यांना मोठा खड्डा खोदलेला दिसला. त्या वेळी धडगाव येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारीदेखील सोबत होते. श्री. चौधरी यांनी त्या खड्ड्याबद्दल गटविकास अधिकाऱ्यांना विचारले. खडकी येथे पाण्यासाठी विहिर खोदलेली आहे, या विहिरीवर शासनाचा बावीस हजार रूपये खर्च झाला आहे, असे उत्तर मिळताच उपस्थित सर्व अधिकारी, आमदार, कार्यकर्ते व पत्रकार यांना आश्चर्याचा धक्का बसला आणि आदिवासी भागात अधिकारी व ठेकेदार जनतेची कशी लूट करतात, याचा उघड पुरावा मिळाला. अशीच अवस्था त्या परिसरातील इतर गावांतही आहे.

अशीच अवस्था जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या इतर योजनांची आहे. खायला पुरेसे अन्न नाही, प्यायला शुद्ध पाणी नाही आणि त्यातच वेळेवर आरोग्यसेवा व औषधोपचार नाहीत अशी अवस्था असल्यानेच या भागातील आदिवासी कुपोषणाला बळी पडतात. अर्थात, त्यांच्यावर अशी परिस्थिती आणणारी यंत्रणाच खऱ्या अर्थी आदिवासींच्या कुपोषणाला जबाबदार आहे.

## रस्त्यांची दुरावस्था

सातपुड्याच्या परिसरातील दळणवळणाच्या सुविधांचा अभाव आणि त्यातच अकार्यक्षम महसूल यंत्रणा ही आदिवासींच्या कुपोषणाला कारणीभूत ठरली आहे. जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो रूपयांची गुंतवणूक करून रस्ते तयार केले. मात्र, सातपुड्याच्या डोंगर दऱ्यांत राहणाऱ्या आदिवासींसाठी साध्या पायवाटाही अद्याप झाल्या नाहीत, ही एक शोकांतिका आहे.

वास्तविक या भागात रस्त्यांची निर्मिती करणे ही ब्रिटीश काळापासूनची कल्पना आहे. ब्रिटीश राजवटीत रस्तेनिर्मितीसाठी सर्वेक्षणही झाले असून, त्यासंबधीचा आराखडा तयार करण्यात आला. मात्र, देशाला स्वातंत्र्य मिळून पाच दशकांचा काळ लोटला आहे, तरीदेखील

### रस्ता

हा इथला अमुचा रस्ता
त्याच्याबदल कशाला हो पुसता?
वाटून घेऊ नका एवढे आश्चर्य
त्याच्यावर झालेत लाखो रुपये खर्च
सध्या सापडत नसला जरी
दहा वर्षापूर्वीच पूर्ण झाला कागदावरी

\- पुरूषोत्तम आगाशे

रस्त्यांचा आराखडा अद्यापही कागदावरच आहे. गेल्या वर्षीच शासनाने अतिदुर्गम भागातील रस्तेनिर्मितीसाठी चाळीस कोटी रूपयांची तरतूद केली. केवळ सर्वेक्षणावर दीड कोटी रूपयांचा खर्च झाला. अर्थात, शासनाची ही योजना अमलात येईलच असे चिन्ह अद्याप तरी नाही.

तोरणमाळ परिसरांतील भागात रस्तेनिर्मितीचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून पडून आहे. त्यानुसार त्या भागात तोरणमाळ ते सिंधी (अकरा किलोमीटर) सिंधी ते सावऱ्या (सात किलोमीटर) सावऱ्या ते फलाई (पाच किलोमीटर), फलाई ते झापी (दोन किलोमीटर), झापी ते कुंड्या (आठ किलोमीटर) कुंड्या ते भाबरी (सहा किलोमीटर) भाबरी ते भादल (दहा किलोमीटर) लेंगापाणी ते धडगाव (चाळीस किलोमीटर) असे हे रस्ते आहेत, तर दुसरा मध्य प्रदेशला जोडणारा मार्ग म्हणजे सिंधी ते चोखणेपाडा (दोन किलोमीटर) चोखणेपाडा ते पन्हाळीपाडा (चार किलोमीटर), पन्हाळीपाडा ते बोण (दोन किलोमीटर) व बोणपासून थेट मध्य प्रदेशातील बोकराटा या गावापर्यंत जाणारा रस्ता आहे. मात्र, हे रस्ते अद्याप तरी केवळ विचाराधीन आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने सपाटीवरील भागात तकलादू रस्ते तयार केले. तरी काही दुर्गम व अतिदुर्गम भागात कागदोपत्रीच डांबरी रस्ते तयार झाले. त्याचे उदाहरण घेतले. तर भांगरापाणी ते नवदलवड जमाना, तोरणमाळ ते धडगाव, अक्कलकुवा तालुक्यातील अक्कलकुव्यापासून शहादा तालुक्यातील राणीपूरपर्यंतचे रस्ते कागदोपत्रीच तयार आहेत. सातपुड्यात १९८० नंतर वनसंरक्षण कायदा अमलात आल्याने रस्त्यांचा विकास होऊ शकला नाही. धडगाव ते तळोदा रस्त्यावरील चांदसैली, कोठा हा सात किलोमीटरचा रस्ता या वनकायद्याने गेल्या पंधरा वर्षापासून पूर्ण होऊ शकला नाही. रस्तेच नाहीत, त्यामुळे आरोग्यसेवा नाही आणि त्यामुळे आदिवासी एकात्मिक योजनेखाली योजनांचा लाभही नाही आणि स्वस्त धान्य दुकानांतही धान्याचा उपभोग घेणेही आदिवासींना शक्य नाही. सोळा कोटी रूपये खर्च झालेली विशेष कृती कार्यक्रम योजना वनवासीचे जीवनमान तर उंचावू शकली नाही. द्वारपोच धान्यवितरण योजना रेशन तस्करांना वरदान ठरली. तर आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासींच्या नावावर भ्रष्टाचाराचे वेगळे विक्रम या जिल्ह्यात आहेत. एकट्या नंदुरबार विभागीय कार्यालयात फक्त बारदान पुरविणाऱ्याने दरवर्षी वीस लाख रूपयांची कमाई केल्याचे सांगितले जाते. याशिवाय शिलाई यंत्रे, वीजपंप किंवा अन्य रोजगाराची साधने पुरविणाऱ्यांचा निविदा आणि बाजारभाव यांची तफावत आदिवासी विकास आयुक्तांनी तपासून पाहिली, तर आदिवासींच्या कुपोषणाला आदिवासी विकास विभागही जबाबदार आहे, याची जाणीव होईल.

जिल्हाधिकारी एस. जे. कुंटे हे कर्तव्यदक्ष अधिकारी या जिल्ह्याला लाभले असले, तरी रेशन आणि रॉकेल तस्करांविषयी अद्यापही त्यांनी मौन पाळले आहे. परिणामी तस्करांची संख्या या जिल्ह्यात वाढली आहे. समाजात प्रतिष्ठित म्हणून वावरणारे पुढारीच जीवनावश्यक वस्तूंची तस्करी करीत असल्याचा उघड आरोप केला जातो. मात्र त्यांचे अधिकाऱ्यांशी संबंध चांगले असल्याने त्यांच्यावर कुठलीही कारवाई होत नाही, हा आरोप खोटा ठरू नये अशी स्थिती आहे. आदिवासी दुर्गम भागात तर स्वस्त धान्य दुकानांचा माल पोचत नाही. नुकतीच आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी यांनी खडकी येथे भेट दिली. त्या वेळी त्या भागातील कुंड्या, झापी, फलाई, बुरूमपाडा, भाबरी, सावऱ्या आदि गावांतील आदिवासींनी मंत्र्यापुढे आपल्याला स्वस्त धान्य दुकानांतील धान्यच मिळत नसल्याची तक्रार केली. यावर मंत्र्यांनी आदिवासींचे रेशनकार्डही तपासून पाहिले आणि चौकशी केली. तोरणमाळ येथील स्वस्त धान्य दुकानदाराने त्या भागातील धान्य वितरणासाठी पाच

आदिवासींकडे सोपविले होते. मात्र, संबंधित दुकानदाराने धान्याचा पुरवठा केला नसल्याचे निष्पन्न झाले. यावर मंत्र्यांनी संबधित दुकानदार राजू इंगळे याच्याविरूद्ध त्वरित गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्याचे आदेश दिले. मात्र पुरवठा विभागाने त्याकडे दुर्लक्ष केले व तब्बल आठ-दहा दिवसानंतरही त्यावर कारवाई केली नाही. फक्त चौकशी सुरू आहे, असे संबंधित खात्याने उत्तर देऊन धान्य दुकानदारावरील कारवाई टाळण्याचा प्रयत्न केला. अशी पुरवठा विभागाची स्थिती असल्याने अतिदुर्गम भागातील आदिवासींपर्यंत शासनाचे धान्य पोचत नाही, अशा अवस्थेत आधीच एका वेळचे जेवण मिळणे कठीण झालेले आदिवासी कुपोषणाचे शिकार होणारच.

## सरकारी यंत्रणा आणि आदिवासी

सातपुड्यातील कुपोषणाला अंधश्रद्धा, निरक्षरता आणि पारंपारिक जीवन पद्धतीमुळे आदिवासी दुरावस्थेला स्वत: जबाबदार आहेत. मात्र, त्यांना त्या परिस्थितीतून बाहेर काढण्यास असमर्थ ठरलेल्या किंबहुना जाणीवपूर्वक आदिवासींना या सोईपासून वंचित ठेवून राजकीय व आर्थिक लाभ पदरात ठेवणारे सर्व नेते व अधिकारीदेखील जबाबदार आहेत.

स्वतंत्र आदिवासी विकास महामंडळ स्थापून कोणाचा विकास झाला हे उघड आहे. धुळे जिल्ह्यातील आदिवासी आजही पूर्वीच्याच स्थितीत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रीपद माजी मंत्री सुरूपसिंग नाईक यांनी अनेक वर्षे भूषविले, आदिवासी विकास मंत्र्यांची जबाबदारीही त्यांनी अनेक वर्षे पार पाडली. १९८९ मध्ये अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागात झालेल्या कुपोषणकांडामुळे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी तेथे भेट दिली होती व आदिवासींच्या विकासाकरिता विशेष कृती योजना घोषित केली होती. त्या योजनेचे अध्यक्ष सुरूपसिंग नाईक हेच होते. या योजनेअंतर्गत सात कोटी रूपयांचा खर्च झाला. महामंडळाने आदिवासींच्या विकासाकरिता १७ कोटी रूपयांचा खर्च केला आहे. यानंतर धुळे जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासींची स्थिती पाहिल्यास कोणाचाही विश्वास बसणार नाही. आदिवासींची स्थिती पाहिल्यानंतर मुख्यमंत्री मनोहर जोशी, आदिवासी विकास मंत्री गो. शि. चौधरी, आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर व मुख्य सचिव शरद उपासनी यांच्या डोळ्यात अक्षरश: पाणी आले. हा पुरावा आदिवासींच्या नावावर होणाऱ्या भ्रष्टाचाराचे दर्शन घडविण्यास पुरेसा आहे.

दुर्गम, अतिदुर्गम भागातील आदिवासींसाठी शासनाने विविध कल्याणकारी योजना राबविल्या, सकस आहार योजना, उच्च प्रतीच्या धान्याचा पुरवठा, स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक सुविधा आदि अनेक योजनांच्या माध्यमांतून आदिवासींचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. टक्केवारी खाणाऱ्या अधिकारी आणि पुढाऱ्यांना सुकडी वाटप योजना लाभदायी ठरली. द्वारपोच धान्यवितरण योजना असूनही अक्राणी आणि अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासींपर्यंत पोचलेली नाही. आदिवासी उपाययोजनेतंर्गत होणारी धान्यखरेदी योजना ही आदिवासी परिसरातील व्यापाऱ्यांसाठी वरदान ठरली. कारण आदिवासी विकास महामंडळ माल खरेदी केल्याबरोबर तत्काळ मालाची किंमत देत नाही. यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागतो.

हातावर पोट असलेले आदिवासी उपाययोजनेत धान्य विकून त्याची किंमत मिळण्याकरता दोन महिने थांबू शकत नाहित, अशा स्थितीत आदिवासी विकास विभाग व्यापारी तत्त्वावर आदिवासींच्या धान्याची खरेदी करतो. हंगामाच्या काळात धान्य मालाचा किंमती कमी असतात. या स्थितीचा फायदा खासगी व्यापारी घेतात. ते कमी किमतीत आदिवासींकडून माल खरेदी करतात आणि

आपल्या खात्यातील एखाद्या सालदाराच्या अथवा एखाद्या आदिवासीच्या नावावर हंगाम संपल्यानंतर वाढलेल्या किमतीत धान्य विकतात. अशीच स्थिती आदिवासी विकास महामंडळात असल्याचे चित्र आहे.

आदिवासींच्या नावावर कोट्यवधी रूपयांचे उलाढाल झाली; पण त्यांना रोजगार धान्य, पिण्याचे पाणी, आरोग्य आदी सेवाही उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. खडकी परिसरातील गोवरकांडानंतर शासनाने तातडीने अनेक उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्या योजना यापूर्वीही जाहीर झाल्या होत्या. फरक एवढाच आहे, की या वेळी सरकार बदलले आहे; परंतु महसूल यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, वन विभाग यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची मानसिकता बदललीच आहे. असे नाही. यातील अनेक अधिकारी व कर्मचारी वीस वर्षांपेक्षाही जास्त काळापासून याच जिल्ह्यात आहेत. लेखनिक म्हणून शासकीय सेवेत रूजू झालेले कर्मचारी याच जिल्ह्यात सर्वोच्च पदावर आहेत. सरकार बदलले तरी शासकीय यंत्रणा तीच असल्याचे या अधिकारी व कर्मचाऱ्यांची काम करण्याची प्रवृत्ती आणि विचार करण्याची वृत्ती बदलत नाही, तोपर्यंत योजना राबविणे शक्य होणार नाही. याची नोंद नव्या सरकारने घेतली पाहिजे. त्याबरोबरच आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाला जबाबदार कोण आहे, याचे प्रामाणिक उत्तर जिल्हा प्रशासनाने शोधले पाहिजे आणि ते उत्तर जाहिररीत्या जनतेपर्यंत पोचविले पाहिजे.

## धान्य पुरवठा

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या दर्शनालाही मुकलेले खडकी ग्रामस्थ आता गेल्या महिन्यापासून रोजचे येणारे नवे-नवे मंत्री, पुढारी, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांचे चेहरे पाहून तृप्त झाले आहेत. तथापि त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत ते हैराण झाले आहेत. वर्षानुवर्षे होणारे आपले कुपोषण थांबेल का, हाच प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

वनविभागामार्फत खडकीपर्यंतच्या पायवाटेचे काम करणाऱ्या मजुरांना अद्यापही मजुरी मिळालेली नाही. खावटीवाटपासाठी खडकी येथे वीस दिवसांपासून धान्य येऊन पोचले असले, तरी अद्याप खावटीवाटपाला सुरवात झालेली नाही. हे धान्य तोरणमाळहून आपल्या डोक्यावर खडकीपर्यंत आणण्याची मजुरीही महसूल विभागामार्फत ठरल्या दराप्रमाणे देण्यात आली आहे. शिधापत्रिकेचे वाटपही अतिशय संथगतीने सुरू आहे. गेल्या महिनाभरात केवळ दहा ते वीस टक्के आदिवासींना शिधापत्रिका मिळाल्या. विहिरी खोदण्याचीही मजुरी कमी दरात देण्यात आली आहे; पण तीही अद्याप पूर्ण देण्यात आली नाही. एकवेळचे जेवण मिळविण्यासाठी धडपड करीत असलेले आदिवासी पेरणीचा हंगाम जवळ येऊनही बियाणे नसल्याने चिंताग्रस्त अवस्थेत आहेत.

सातपुड्याच्या अतिदुर्गम खडकी परिसरात गेल्या एप्रिलमध्ये गोवरच्या साथीने व कुपोषणाने किती तरी बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती बाहेर आली. त्यानंतर शासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली. लोकप्रतिनिधींनी त्यांची गंभीर दखल घेतली. पिढ्यानपिढ्या उपेक्षित असलेल्या आदिवासींवर सहानुभूतीचा वर्षाव होऊ लागला. सात मेस आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी यांनी या भागाला प्रत्यक्ष भेट दिली. त्यानंतर १७ मेस मुख्यमंत्री मनोहर जोशी, राज्याचे मुख्य सचिव शरद उपासनी, आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर, संपर्कमंत्री चौधरी यांच्यासह अनेक मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी या भागाला भेट दिली. त्यानंतर रोजचे नवे-नवे अधिकारी व लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांचीही या भागात वर्दळ सुरू झाली आहे. मात्र येथील आदिवासींची अवस्था मात्र

फारशी बदललेली नाही.

स्वत: मुख्यमंत्र्यांनी या आदिवासींची स्थिती पाहून त्यांच्या विकासासाठी अनेक योजनांची घोषणा केली. त्या योजनांची त्याच दिवसापासून अंमलबजावणी करण्याचे आदेश मुख्य सचिव शरद उपासनी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार उशिरा का होईना; परंतु कामाला सुरवात झाली; पण त्यात आदिवासींना नेमके काय लाभणार, हा प्रश्न आहे.

खडकी भागात पिण्याच्या पाण्यासाठी कारभारीपाडा, दुकानपाडा येथे प्रत्येक एक व पाटीलवाडा येथे दोन अशा चार विहिरी खोदण्यात विहिरीची मजुरी अद्यापही देण्यात आलेली नाही. ही विहीर खोदण्यासाठी खडकी येथील तेवीस मजुरांनी दोन दिवस काम केले आहे. या विहिरी खोदण्यासाठीही अतिशय कमी मजुरी म्हणजे शंभर रूपये हात (दीड फूट) याप्रमाणे देण्यात आली आहे. या विहिरीचे पक्के बांधकाम अद्यापही सुरू नाही. पावसाळ्यापूर्वी हे काम होणे होणे आवश्यक आहे. या विहिरी ओढ्याच्या कडेला खोदल्या असल्याने पहिल्याच पावसात त्या निकामी होतील; पण ज्या गतीने काम चालू आहे ते पाहिले, की विहिरी गायब होण्याची शक्यताच अधिक दिसते.

खडकी भागात दळणवळणाची कुठलीही सुविधा नाही. खडकी पॉईंट ते खडकीपर्यंत पायवाट करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार वन विभागाने हे काम घेतले. पंधरा दिवसांत खडकी पॉईंट ते खडकी ही सुमारे चार किलोमीटरची पायवाट पूर्ण केली. या कामावर ९९ हजार रूपये खर्च करण्यात आले; पण त्यासाठी राबणाऱ्या खडकी येथील मजुरांना अद्यापही मजुरी मिळालेली नाही. पायवाटेचे कामही नीट झालेले नाही. पायवाटेवर मोठमोठी धारदार खडी पसरली आहे. विशेष म्हणजे आदिवासी पायात वहाण घालत नसल्याने या वाटेवरून जाताना त्यांना खूप त्रास होतो. या पायवाटेचा उपयोग न करता आदिवासींनी वेगळीच पर्यायी वाट शोधली आहे. रस्त्यावर काम करणारे खडकी येथील सश्या नेमण्या नाईक, सारज्या नाईक, गिलदार नाईक, किसन नाईक, ठग्या नाईक, पुठ्या नाईक, डोगा नाईक, सोपन्या नाईक, रत्या नाईक, दिल्या नाईक, उकाऱ्या नाईक, लायसिंग नाईक आदी मजुरांशी चर्चा केली. ते म्हणाले, की या पायवाटेसाठी आम्ही पंधरा दिवस काम केले; पण मजुरी अद्याप मिळालेली नाही. या कामासाठी रोज तीस रूपये देण्याचे कबूल केले गेले. काम पूर्ण होऊन आज दहा दिवस झाले, तरी मजुरी मिळालेली नाही, पेरणीचा हंगाम जवळ आला आहे. बियाणे घेण्यासाठी आम्हाला पैशांची गरज आहे. खायला अन्न नाही. सरकारने आपल्याला काम दिले असले, तरी मजुरी देण्यास टाळाटाळ होत आहे. सरकारवरचा आमचा विश्वास आता उडू लागला आहे.

> ## उपजीविका
>
> तुटत चालले वन<br>
> संपले जंगल उत्पादन<br>
> नाही उपलब्ध शेतजमीन<br>
> अन् उत्पन्नाचे साधन<br>
> मिळत नाही दोन वेळचे जेवण<br>
> मग का न होईल कुपोषण?
>
> – पुरूषोत्तम आगाशे

आदिवासींना खाण्यासाठी धान्य नसल्याने कुपोषणग्रस्त भागात शासनामार्फत खावटी वाटपासाठी अक्कलकुवा आणि अक्राणी तालुक्यांत एकूण दहा केंद्रे सुरू केली आहेत. त्यांपैकी खडकी भागात खडकी आणि कुंड्या या दोन ठिकाणी ही केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रावर शंभर क्विंटल गहू व ११० क्विंटल तांदूळ असे

धान्य खावटीसाठी देण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार, महसूल विभागाने त्या केंद्रावर तत्काळ धान्य पोचते केले असले, तरी अद्यापही त्यांचे वाटप सुरू नाही. त्यामुळे धान्य येथे कशासाठी आणले, असाच प्रश्न हे आदिवासी विचारत आहेत.

धान्याचा साठा खडकी येथे ज्याच्या घरात केला आहे, तो घरमालक ग्रामपंचायत सदस्य गुजरा शिरका नाईक याने सांगितले, की माझ्या घरात धान्याचा साठा करून वीस दिवस झाले. त्याचे वाटप होत नाही. उलट काही कमी जास्त झाल्यास माझ्यावर जबाबदारी येईल, अशी भीती वाटते.

पोलिस पाटील डेड्या खुमान नाईक याने सांगितले, की पाऊस कधी येईल हे सांगता येत नाही. पाऊस सुरू होण्यापूर्वी हे धान्यवाटप झाले पाहिजे. अन्यथा घर कौलारू असल्याने सारे धान्य खराब होईल; सध्या लोकांना धान्य नसल्याने शासनाने त्याचे वाटप करणे आवश्यक आहे. त्याबाबत रावसाहेबांना सांगितले. वरून आदेश आल्यावर वाटणार असे ते सांगतात. त्यामुळे आता आम्ही सरकारच्या आदेशाच्या प्रतिक्षेत आहोत. हे धान्य तोरणमाळपासून खडकीपर्यंत ज्या आदिवासींनी डोक्यावर वाहिले, त्यांना मजुरीही निम्मीच देण्यात आली. एका फेरीचे २५ रूपये असे धान्यवाहतुकीचा दर ठरला होता. प्रत्यक्षात मात्र बारा रूपये मजुरी मिळाली. सर्व आदिवासींना शिधापत्रिका मिळालेल्या नाहीत. एकंदरित कुपोषणाबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन, जो गाजावाजा झाला त्याप्रमाणे प्रत्यक्षात हालचाली सुरू नाहीत.

मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांनी प्रत्यक्ष भेटीनंतर व्यक्त केलेली तळमळ आणि स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची कार्यपद्धती यात कुठेही सुसंगती आढळून येत नाही.

## गावठाण योजना

आदिवासींच्या विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी खास गावठाण योजनेची घोषणा केली असली, तरी या कुपोषणग्रस्त अक्राणी तालुक्यातील या भागात महसुली गावठाण जमीन उपलब्ध नसल्याने त्यांना या योजनेपासून वंचितच रहावे लागणार आहे.

अक्राणी तालुक्यातील जवळजवळ सर्वच गावे अतिदुर्गम भागात आहेत. त्यापैकी बहुतांश गावांची वसाहत ही वनविभागाच्या अतिक्रमित जागेवर आहे. ही अतिक्रमित वनगावे महसुली व्हावीत यासाठी आदिवासींचा लढा वीस वर्षापासून सुरू होता. त्यानुसार अक्राणी तालुक्यातील एकूण ३३ गावांना महसुली गाव करण्याचा निर्णय शासनाने ३१ डिसेंबर १९९२ ला घेतला. मात्र वन कायद्याच्या अडचणीने त्याला पुन्हा स्थगिती देण्यात आली. या वसाहती विखुरलेल्या पाड्यापाड्याच्या स्वरूपात आहेत अगदी २०० लोकवस्तीचे गाव देखील चार ते सहा चौरस किलोमीटर क्षेत्रात वसलेले आहे. येथील प्रत्येक आदिवासी आपण कसत असलेल्या शेतातच आपले घर करून राहतात.

कुपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री मनोहर जोशी व आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी यांनी या भागाला भेट दिल्यानंतर त्यांना या आदिवासींच्या विकासासाठी एक महत्वपूर्ण योजना सुचली. ती म्हणजे 'गावठाण योजना' विखुरलेल्या स्वरूपात राहणाऱ्या प्रत्येक पाड्यापाड्यातील आदिवासींना एकत्र करून, एकाच ठिकाणी गावठाण जागेवर शासनाने घरे बांधून त्यांची वसाहत करावी आणि तेथेच शासनाने पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आदी प्राथमिक सुविधा उपलब्ध कराव्यात, तेथूनच या आदिवासींना ते कसत असलेली शेती पहावी. अशी ही योजना आहे; पण त्यास खडकी, कुंड्या, फलई, झापी, सावऱ्या, डध्या, भादल, भावरी,

सिंधी आदी गावांतील आदिवासींनी मुख्यमंत्र्यांसमोर नकार दिला होता. मात्र ही योजना कार्यकर्त्यांमार्फत त्यांच्याच भाषेत समजावून सांगितल्यावर आदिवासी तयार झाले. या योजनेचे त्यांनी स्वागतही केले. मात्र गमतीची बाब अशी, की त्या भागात एकही गाव महसुली नसल्याने तेथे महसुली गावठाण जमीनच उपलब्ध नाही. त्यामुळे गाव कुठे वसवावे याबाबत प्रश्न पडला आहे. तेथील गावे वनगावे आहेत. वन कायद्यामुळे शासनाला जागा मिळणे अशक्य आहे. त्यामुळे गावठाण योजनेचा लाभ आदिवासींना होणार नाही, असे स्पष्ट चित्र आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांनी स्वत: चर्चा करून जागा उपलब्ध केली, तरच गावठाण योजना अक्राणी तालुक्यातील आदिवासींना मिळणे शक्य होईल.

## धान्यकोष योजना

पावसाळ्यात अतिदुर्गम भागातील आदिवासींकडे खाण्यासाठी धान्य नसते. याबरोबरच पेरणीसाठी बियाणेही नसते. त्यामुळे ते पावसाळ्यापूर्वी गावातील कारभारी किंवा पाटील यांच्याकडून दर वर्षी धान्य उसने घेतात. पावसाळ्यानंतर आपले उत्पन्न आल्यावर जेवढे धान्य घेतले त्याच्या दुप्पट धान्य संबंधिताला परत करतात. आदिवासी भागातील ही प्रथाच आहे. या आधारावर आदिवासींची समस्या लक्षात घेऊन शासनाने धान्य-कोष योजना सुरू केली आहे. आदिवासी विकास मंडळामार्फत खावटी कर्ज योजनेची व्याप्ती लाभार्थींच्या कर्जबाजारीपणामुळे सीमित होते. म्हणून ग्रामपातळीवर सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने ही योजना राबवायची असेल, त्या गावात प्रतिष्ठित लोकांचे एक मंडळ स्थापन करावे किंवा एखाद्या सेवाभावी संघटनेकडे ते सोपविण्यात यावे. त्यांनी व शासकीय प्रतिनिधींनी गावाचे सर्वेक्षण करावे. किती लोकांना धान्यांची गरज आहे व त्यासाठी किती धान्य लागेल यांची माहिती काढावी. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळामार्फत त्या सेवाभावी संघटनेला आवश्यकतेच्या निम्मे धान्य द्यावे, सेवाभावी संघटनेने ग्रामस्थांच्या सहकार्याने ते गोळश करावे आणि गरजूंना कर्जस्वरूपात द्यावे. त्याचे उत्पन्न आल्यावर संबंधितांकडून ते धान्य परत आणावे, अशी ही धान्य-कोष योजना आहे. धुळे जिल्हातील अक्राणी, तळोदा, अक्कलकुवा, शहादा आणि शिरपूर या पाच तालुक्यांतील अतिदुर्गम भागातील आदिवासींना सुरू केली. या योजनेचा लाभ होणार आहे. अक्राणी तालुक्यातील एकूण ८५ अतिदुर्गम गावे असून तेथे धान्य-कोष योजना राबविण्यासाठी १२ सेवाभावी संघटनांची आवश्यकता आहे.

धुळे जिल्ह्यात धान्य-कोष योजना राबविण्यासाठी एकूण सुमारे चाळीस सेवाभावी संस्थांची आवश्यकता असताना, एकही संघटना अद्याप पुढे न आल्याने ही योजना राबविण्याची अपेक्षाही संपुष्टात आली आहे. वास्तविक अक्राणी तालुक्यातील कुपोषणग्रस्त गावांतील आदिवासींची आदिवासींची स्थिती लक्षात घेतल्यास, आदिवासींना आज धान्याची आवश्यकता आहे. गेल्या वर्षी उत्पन्नही ठीक नव्हते. उसने धान्य देणारे कारभारी व पाटील यांच्याकडे धान्य शिल्लक नसल्याने आदिवासींना उसने धान्य मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत शासनाची योजना आदिवासींना तारू शकली असती. मात्र यातील त्रुटींमुळे ती अद्याप सुरू होऊ शकली नाही. ही योजना शासनाने स्वत: राबवली असती, तर त्याचा फायदा आदिवासींना झाला असता. शासनाने केवळ योजना आखल्या. मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी नियोजन नसल्याने आदिवासींना त्यापासून वंचित राहावे लागले आहे.

## शिक्षणाची दैन्यावस्था :

शिक्षक शाळेत येत नाहीत म्हणुन कुंड्या, भाबरी, भादल, उडद्या, खापरमाळ येथील ग्रामस्थांनी खासगी शिक्षक सांगून आपल्या मुलांना साक्षर करण्याचा पर्यायी मार्ग शोधला आहे. पिढ्यानपिढ्यापासून आपल्या माथ्यावर असलेला निरक्षरतेचा कलंक पुसून टाकण्यासाठी अतिदुर्गम भागातील आदिवासींची ही धडपड आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरूणांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे. दरम्यान खडकी येथे कुपोषणग्रस्त भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटावा यासाठी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या वर्षापासून खडकी येथे शासकीय आश्रमशाळा सुरू करण्याची घोषणा केली होती. मात्र २९ मेपासून सर्वत्र शासकीय आश्रमशाळा सुरू झाल्या असल्या, तरी खडकी येथील नव्या आश्रमशाळेची पूर्वतयारीही झालेली नाही. त्यामुळे ही शाळाही यावर्षी सुरू होणार की नाही, याबाबत साशंकताच आहे.

सातपुड्याच्या पायथ्याला आणि सहाव्या पर्वतरांगेच्या दरम्यान खडकीपासून चार किलोमीटरवर कुंड्या गाव आहे व तेथून पुढे थेट नर्मदा किनारपट्टीपर्यंत उडद्या, खापरमाळ, भाबरी व भादल ही गावे आहेत. नुकत्याच उद्भवलेल्या कुपोषणात खडकीपेक्षाही कुंड्या येथील बालके अधिक दगावली. हे गाव खडकीपेक्षाही अतिदुर्गम भागात असल्याने अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना कुंड्यापर्यंतही जाणे शक्य झाले नसल्याने कुपोषणाच्या कुप्रसिद्धीपासून हे गाव दूर राहिले. अर्थातच खडकी येथे ज्या ज्या वेळी मंत्री व वरिष्ठ अधिकारी आले त्या त्या वेळी कुंड्या येथील आदिवासींना खडकी येथे बोलावण्यात आले.

### शाळा

ऐसी इथली शाळा
नाही खडू नाही फळा
हवेशीर इथल्या भिंती
छपराला लागते गळती
पोरं इथं शिकायला जाती
कधीतरी मास्तर आल्यावरती

- पुरूषोत्तम आगाशे

कुंड्या येथील जिल्हा परिषदेची पहिली ते चौथीपर्यंत शाळा आहे. या शाळेवर दोन शिक्षकांची नियुक्ती झालेली आहे. मात्र, वर्षानुवर्षापासून ते शाळेवर आलेच नाहीत. त्याबाबत तेथील आदिवासी पालकांनी अनेकांकडे वारंवार तक्रारी केल्या. पण उपयोग झाला नाही. शेवटी पालकांनी आपल्या मुलांना साक्षर करण्यासाठी खासगी शिक्षक शोधून त्यालाच पगार सुरू केला. आंबापूर (ता. शहादा) येथील सजन आबला पावरा हा बी.ए. झालेला तरूण या गावातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जातो. तेथील सुमारे चाळीस विद्यार्थी त्याच्याकडे शिक्षण घेतात. त्याला प्रत्येक विद्यार्थ्याकडून दरमहा तीस रूपये मिळतात. दीड वर्षापासून हा तरूण तेथील जिल्हा परिषदेच्या रिकाम्या पडलेल्या शाळेत शिकवणी घेत आहे. आपला मुलगा कुठल्या इयत्तेत शिकतो आहे, याचा आदिवासी पालकांना काहिही पत्ता नाही. आपल्या मुलाला सही करण्यास जरी या खासगी मास्तराने शिकविले तरी पुष्कळ झाले, अशी त्यांची प्रतिक्रिया आहे. भुऱ्या पावरा, खैऱ्या हरिसिंग पावरा, राजलाती पावारा, उड्या रूपसिंग पावरा, रायसिंग कायल्या पावरा, टेट्या भीमसिंग पावरा, दादला भुऱ्या पावरा या पालकांनी अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

पोलिस पाटील पांडा भुऱ्या पावरा म्हणाले, की शासनाने आमच्या मुलांना शिकविण्यासाठी शाळा दिली आहे. शिक्षक दिले आहेत. मात्र, ती शाळा व्यवस्थित सुरू आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी

अधिकाऱ्यांची आहे. मात्र, या शाळेची पाहणी तर सोडाच, उलट त्यांच्याकडे केलेल्या तक्रारींची दखलही घेतली गेली नाही. यापेक्षा आम्हा आदिवासींचे दुर्दैव कुठले असू शकते? आम्हा लोकांना कायमचेच निरक्षर ठेवण्याचा शासनाचा हेतू आहे, अशीच स्थिती आहे. त्यामुळे आमच्या मुलांना किमान सही करण्याइतपत तरी शिक्षण मिळावे यासाठी आम्ही खासगी शिक्षक नेमले आहेत.

कुंड्याप्रमाणेच त्या भागातील उडद्या, भाबरी, खापरमाळ, भादल आदी गावांची स्थिती आहे.

वास्तविक अतिदुर्गम भागातील विद्यार्थी शाळेत येत नाहीत. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण अधिक आहे, अशी ओरड या भागातील शिक्षकच करतात. त्याच कारणांवरून संबंधित वरिष्ठ अधिकारीदेखील त्या शिक्षकांकडून आपले 'स्वार्थ' साधून या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात. शाळेवर न जाण्याबद्दल या भागातील प्रत्येक शिक्षकाकडून महिना १५० ते २०० रूपये तालुका पातळीवरील वरिष्ठ अधिकारी घेत असल्याची चर्चा उघडपणे होते.

मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांचा या भागात प्रत्यक्ष दौरा झाल्याने शिक्षणाची अवस्था उघड झाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांना संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश त्यांनी तेथेच दिले. त्यानुसार त्या भागातील खडकी, झापी, फलाई, कुंड्या, भादल, भाबरी साऱ्या आणि तोरणमाळ येथील एकूण १३ शिक्षकांवर व मांडवी व जबर्डी या दोन भागांतील शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांवर तात्पुरती कारवाई झाली. त्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

खडकी येथे याच वर्षापासून शासकिय आश्रमशाळा सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. मात्र, नव्या आश्रमशाळेविषयी काही हालचाली झालेल्या नाहीत. आश्रमशाळा सुरू होण्यापूर्वी येथे वसतीगृह आणि शाळेसाठी इमारतीचीही व्यवस्था अद्याप झालेली नाही. किंबहुना जागेची पाहणीही झालेली नाही. इतर शाळांचे कामकाज सुरू होऊन पंधरा दिवस झाले. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली नवी शाळा मात्र कागदावरच आहे.

## अक्राणी, अक्कलकुवा भागातील कुपोषण

खडकी परिसरात कुपोषणाने एकाही बालकाचा बळी गेला नसल्याचे पत्रक प्रशासनाने काढले असले, तरी एकंदर स्थिती विचारात घेता त्या बालकांचा मृत्यू कुपोषणामुळेच झाला, हे स्पष्ट होते. अक्राणी आणि अक्कलकुवा तालुक्यांत अद्याप सुमारे एक हजारापेक्षाही जास्त कुपोषित बालके असून, त्यांपैकी सुमारे दोनशे बालके गंभीर स्थितीत आहेत. आरोग्य विभागाने या बालकांचे सर्वेक्षण केले; मात्र यापुढे त्यांचे भवितव्य काय असेल, याबाबत शासनाने अद्याप मौन पाळले आहे.

आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार अक्राणी तालुक्यात तिसऱ्या श्रेणीची ३६९ कुपोषित बालके आहेत, तर शेवटच्या म्हणजे चौथ्या श्रेणीची (अतिशय गंभीर स्थितीतील) १४२ बालके आहेत. खडकी परिसरातील तोरणमाळ, खडकी, लेंगापाणी, भादल, झापी, फलई, सिंधी आणि कुंड्या या गावांत तिसऱ्या श्रेणीची १२३, तर शेवटच्या श्रेणीची ४१ बालके आहेत. महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या तोरणमाळ येथे सर्वात जास्त म्हणजे तिसऱ्या श्रेणीची ४९ व शेवटच्या चौथ्या श्रेणीची दहा बालके आहेत. खडकी व कुंड्या येथे अतिशय गंभीर अवस्थेतील अनुक्रमे १३ व दहा कुपोषित बालके आहेत. अक्कलकुवा तालुक्यातील कुपोषित बालकांच्या सर्वेक्षणाचे काम झाले असून, तेथे तिसऱ्या श्रेणीची ३५६ व चौथ्या श्रेणीची ४३ बालके आहेत.

कुपोषित बालकांच्या सर्वेक्षणाचे काम पंधरा दिवसांपूर्वी पूर्ण झाले असून, अद्याप त्यांना शासनातर्फे दोन घास निकृष्ट खिचडी देण्यापलीकडे काहीही प्रगती झालेली नाही. खिचडीचे वाटप अंगणवाडीतर्फे करण्यात येते. त्यामुळे ज्या घरात कुपोषित बालक आहे. त्या प्रत्येक बालकापर्यंत ही खिचडी पोचतेच असे नाही. याबाबत अनेक पालकांच्या तक्रारी आहेत. कुपोषित बालकांना खिचडी देण्याची योजना १७ मे रोजी सुरू झाली. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते योजनेचे उद्घाटन झाले. आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांनी खिचडीची चव घेवून त्यात शेंगदाणे टाकण्याची सूचना केली होती. मात्र प्रत्येक बालकामागे केवळ सत्तर पैसे खर्च करण्याची तरतूद असल्याने ते शक्य होणार नाही, असे संबंधित अधिकाऱ्याने स्पष्ट केले होते. त्यानुसार मंत्र्यांनी खिचडीसाठी अनुदान वाढविण्याचे मुख्य सचिवांना सुचविले होते. त्यावर अद्याप निर्णय झाला नाही. त्यामुळे प्रत्येक बालकाला जेमतेम फक्त दोन घास तांदूळ आणि तूरडाळ शिजवून त्यात चव येण्यासाठी मीठ व चटणी घालून तयार केलेली खिचडी देण्यात येते. अंगणवाडीतर्फे सुकडीऐवजी कुपोषण थांबविण्यासाठी खिचडी देण्याची शासनाने योजना आखली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे खिचडीपेक्षा आदिवासी सुकडी बालके चवीने खात होती.

कुपोषित बालकांसाठी शासनाने प्रत्येक बालकाला ६७ किलो धान्य व ३७ रूपये रोख रक्कम, असे एकूण चारशे रूपये देण्याची तरतूद केली आहे. मात्र खडकी परिसरातील आदिवासी बालकांना अद्याप ते देण्यात आले नाहीत. याउलट अक्कलकुवा तालुक्यातील भगदरी व इतर भागांत आदिवासी विकासमंत्री गोविंदराव चौधरी यांच्या हस्ते धान्य व रोख रकमेचे वाटप काही दिवसांपूर्वीच सुरू करण्यात आले. प्रत्यक्षात कुपोषणाच्या नावाने ज्या भागांचा गाजावाजा झाला; त्याच भागात अद्याप मदतीचे वाटप न झाल्याने प्रशासनाची काम करण्याची पद्धत व गतीचा अंदाज येऊ शकतो.

शासनाने केवळ योजना आखल्या; परंतु त्याचा आदिवासींना लाभ होतो का, हे जाणून घेण्याकडे दुर्लक्ष केले. या सर्व योजना व्यवस्थित राबविण्यात आल्या का? व त्यानंतर आदिवासींच्या जीवनात काय परिवर्तन झाले, हे पाहण्यासाठी स्वत: मुख्यमंत्री मनोहर जोशी व मुख्य सचिव शरद उपासनी सहा महिन्यानंतर पुन्हा खडकी परिसरात येणार असल्याचे आश्वासन त्यांनी आदिवासींना दिले आहे. विरोधी पक्षाने या भागातील कुपोषणाची स्थिती जाणून घेण्यासाठी 'सत्यशोधक समिती' स्थापन करून सत्य शोधण्याचा प्रयत्न केला. त्यात ते स्वत:च दोषी असल्याचे त्यांना आत्मपरीक्षण झाल्याने (व ते त्यांनी स्वत: मान्य केल्याने) त्याबाबत ते लक्ष घालतील, असे आज तरी चित्र नाही.

विरोधी पक्ष या नात्याने केवळ आदिवासी विकास प्रश्नावर सरकारच्या त्रुटी त्यांच्या लक्षात आणून देण्याची भूमिका बजावण्याइतपतदेखील ते सक्षम नसल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. विरोधी काँग्रेस (आय) पक्षाने स्थापन केलेली सत्यशोधन समिती सत्य शोधण्यासाठी अतिदुर्गम खडकी परिसरातील आदिवासींच्या दारापर्यंत पोचू शकली नाही. याउलट आदिवासींनाच आपली गाऱ्हाणी मांडण्यासाठी कष्ट करून व रोजगार बुडवून या समितीपुढे यावे लागले. सेवाभावी संघटना आदिवासींच्या विकासासाठी पुढे येऊ शकतील, अशी स्थिती आज तरी नाही. धान्यकोष योजना राबविण्यासाठी सेवाभावी संघटनांना आवाहन करूनही एकही संघटना पुढे आली नसल्याने सामाजिक कार्यकर्त्यांची मदतही आदिवासींना मिळणे कठीण झाले आहे.

● ● ●

*(सौजन्य - दै. सकाळ, मे-जून ९५ मधील मालिका)*

(पान ३ वरून)

मृत्युकांडाने स्पष्टच केले आहे. नोकरशाही इतकी मुर्दाडपणे वागत असेल तर तिच्या मुसक्या आवळाव्या लागतील. नोकरशाहीत माजलेले भ्रष्टाचाराचे तण समूळ मुळासकट उपटून काढावे लागेल. आणि आदिवासींचे अज्ञान दूर करून, अंधश्रद्धा त्यांना बाजूला ठेवून भाग पाडून त्यांच्या हिताच्या चार गोष्टी समजावून देण्याची मोहीम हाती घ्यावी लागेल. त्यांच्या जमिनी, त्या जमिनीचा योग्य तो वापर करून मिळवावयाचे कृषी उत्पादन, त्यासाठी आवश्यक ते कृषीविषयक ज्ञान या कृषिउत्पादनांच्या बाजारपेठेची यंत्रणा, त्यासाठी आवश्यक ते दळणवळण साधने, पाणी आणि शिक्षण आदी बाबी आदिवासींना कशा पुरवावयाच्या याचा आराखडा तयार करावा लागेल आणि हे करत असताना त्यांना त्यांच्या आदिवासी संस्कृतीपासून तोडले जाणार नाही याचीही काळजी घ्यावी लागेल. कालांतराने आदिवासी परिसर नैसर्गिक वैशिष्ट्ये न गमावताही तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावणारा कसा होईल हे पाहावे लागेल. हे काम अर्थातच एकट्या शासनाचे नाही. ठाणे धुळे परिसरात काही समाजसेवी संस्था त्यासाठी काम करीत आहेत. परंतु हे काम खूप अपुरे आहे आणि त्यातही काही वेळा काही मंडळी स्वत:ची सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय मक्तेदारी या भागात निर्माण करु पहातात, असेही निदर्शनास आले. अशी मक्तेदारी टाळून खऱ्या अर्थाने संबंधितांना प्राथमिक तत्त्वावर आरोग्यसुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्यात आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे यासाठी समाजहितैषी कार्यक्रम हाती घ्यायला हवेत. सरकारी आणि बिनसरकारी पातळीवरून एकत्रितरित्या हे काम झाले तरच यापुढील काळात तरी असे अपमृत्यू टळू शकतील. अन्यथा नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे कुपोषण नित्यनेमाने आपले बळी घेतच राहील. हे टळायला हवे.

● ● ●

*(संपादकीय दै. सकाळ १६ मे ९५)*

---

(पान ४ वरून)

महामंडळे आणि विद्युत महामंळाचे अधिकारी गैरहजर होते. अनेक ठिकाणी ग्रामसेवक, तलाठी गावात राहत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यांनी गावात राहण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेचे काम समाधानकारक नसून, त्यात अनेक त्रुटी आहेत.

अन्न व नागरी पुरवठामंत्री शोभाताई फडणवीस यांनी सांगितले, की आदिवासी दुर्गम भागात पावसाळ्यानंतर धान्य पोचविणे त्रासाचे असल्याने तीस मेपर्यंत दुर्गम भागातील गोदामात तीन महिन्यांचे धान्य साठवून ठेवण्यात येणार आहे. महामंडळ किंवा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत गोदामातून धान्य पुरविता न आल्यास तलाठ्यामार्फत धान्य पुरविले जाईल.

पालकमंत्री साबीर शेख यांनी आपल्या भाषणात, जव्हार-मोखाड्यात १९९३ ची पुनरावृत्ती होऊ देणार नाही, अशी ग्वाही या वेळी अधिकाऱ्यांच्या वतीने दिली.

सभेनंतर आरोग्यमंत्र्यांनी जव्हार येथील ग्रामीण रूग्णालयाला भेट दिली. तेथे नव्याने बसविलेल्या क्ष-किरण यंत्राचा त्यांच्या हस्ते शुभारंभ झाला. मंत्र्यांच्या या संयुक्त बैठकीनंतर पालकमंत्र्यांनी 'झाप' या गावाला भेट दिली. त्या वेळी त्यांना दोन मुली ३० ते ४० टक्के आणि दोन मुली ६० ते७० टक्के कुपोषणग्रस्त असल्याचे सांगण्यात आले. ही बलके कुपोषणग्रस्त असल्याचे आठ दिवसांपूर्वी आढळून आले. परंतु त्यांना सकस आहार देण्यात येत नसल्याचे मंत्र्यांना सांगण्यात आले.

*(सौजन्य : दै. सकाळ, २२ मे ९५)*

# पेज-आंबील..!

- जनार्दन पाटील

उंच डोंगर लागून सपाटीला
चार घरटी बांधून झोपडीला
जवळी गावाचे नाव त्या वाडीला
वसे कातकरी वनवासी मेळा
दळी जमीनी वरी, नागली पिकाला
तवूस, जिबडे, लागून फळं वेलीला
काल वर्ष तूं गुजराण असा केला
वरी, नागली आंबील नशीबाला
तीन दगडांची जळे चूल उबेला
अर्धपोटी पीत अंगी बाला
निसर्गाच्या नियमीच बद्धतेला
चुकला का कधी टळेना कुणाला?
एक पाठी, एक कटी, एक पोटी
दोन खांबी झोपडी होय दाटी
पेज-आंबील शिजवून माती वाटी
कवळी काकडी तोडून भरी पाटी
डोंगरीच्या राजास कसली भीती!
जगती, मरती, पुरुनिया किती जाती?
असुनी स्वातंत्र्या सूर्य भारतासी
प्रकाशाचा लवलेश नसे त्यासी!

• • •

# 'कुपोषण'

– पुरूषोत्तम आगाशे

आदिवासी भागात होता कुपोषण
सरकारला येते आठवण

मंत्र्यांना येते जाग
दौरा होतो लगोलग

होते खेड्यांची पाहणी
विमाने आणि मोटारगाड्यांनी

केल्या जातात घोषणा
जाहीर होतात योजना

दिली जाते थोडीशी मदत
केवळ येण्यासाठी फोटोत

फिरतो सहानुभुतीने हात पाठीवरनं
लगेचच केले जाते प्रयाण

मदत वाटपासाठी सरकारचं असतं खातं
पण त्यातलंच कुणीतरी खात असतं

होत नाही मदतीचे पूर्ण वाटप
पोहोचायच्या आधीच संपून जाते आपोआप

जाहीर झालेल्या योजना राहतात कागदावर
आठवण होते पुन्हा एकदा कुपोषणाचे बळी गेल्यावर

● ● ●

# कुपोषण थांबविण्यासाठी कृती आराखडा

धुळे जिल्ह्यातील आदिवासींचे कुपोषण थांबविण्यासाठी राज्य सरकारने नवसंजीवन योजनेखाली कृती आराखडा तयार केला आहे. या योजनेअंतर्गत रोजगारनिर्मिती, आरोग्य सुविधा, पिण्याचे शुद्ध पाणी, पोषक आहार, धान्यपुरवठा यासाठी एकत्रित योजना राबविण्यात येणार आहे.

धुळे जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या २० लाख २५ हजार असून त्यातील आदिवासी लोकसंख्या ११ लाख ५१ हजार आहे. ही आदिवासी संख्या राज्यात सर्वाधिक आहे. जिल्ह्याच्या दहापैकी चार तालुके पूर्णत: आदिवासी व चार अंशत: आदिवासी आहेत. अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, शहादा व शिरपूर या पाच तालुक्यांत नवसंजीवन योजनेची कार्यवाही करण्याचे सरकारने ठरविले आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील २७ लाख ७३ हजार लोकसंख्येपैकी धुळे जिल्ह्यातील लोकसंख्या पाच लाख ६२ हजार आहे. धुळे जिल्ह्याच्या या पाच तालुक्यांत २७५ गावे व ३४४ पाडे आहेत.

रोजगारविषयक कार्यक्रमासाठी रोजगार हमी योजनेची ११३, जवाहर रोजगार योजनेची ३१४ व आश्वासित रोजगार योजनेची ११३ कामे हाती घ्यावयाची आहेत. त्यासाठी अनुक्रमे एक कोटी ४३ लाख रूपये, तीन कोटी ३७ लाख रूपये व सात कोटी ३८ लाख रूपये एवढा निधी उपलब्ध होईल. एकूण १५ लाख ४३ हजार मनुष्य दिवस काम होईल.

आरोग्य सेवेखाली या पाच तालुक्यांत एक कुटिर रूग्णालय, तीन ग्रामीण रूग्णालये, ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, सहा प्राथमिक आरोग्य पथके, ११ फिरती आरोग्य पथके, सात आयुर्वेदिक दवाखाने व एक ॲलोपथिक दवाखाना अशा सुविधा आहेत. एकूण १७ वैद्यकीय अधिकारी पदे मंजूर आहेत. त्यांपैकी दहा पदे रिक्त आहेत. ती भरण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा चालू आहे. रिक्त पदांवर उपलब्ध अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करण्यात येत आहे. या संवेदनशील भागातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यांतील प्रत्येक गावाची आणि पाड्याची पाहणी करून प्रतिबंधात्मक व उपचारात्मक वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. कुपोषित तिसऱ्या व चौथ्या श्रेणीच्या मुलांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना पूरक आहार पुरविण्यात येत आहे.

या पाचही तालुक्यांत पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासाठी ६९ नळ पाणीपुरवठा योजना, २१८ हातपंप व ७९ वीजपंप कार्यान्वित आहेत. या भागात २७२ विहिरी आहेत. या पाचही तालुक्यांत १,०६,९०८ बालकांना पूरक पोषक आहार व लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आणखी १८ हजार लाभार्थींना या सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. या कार्यक्रमासाठी ४९ लाख रुपयांची आवश्यकता आहे. पूरक आहार म्हणून खिचडी देण्याचा प्रस्ताव आहे. प्रथिनयुक्त बिस्किटांचे वाटप करण्यात येणार आहे.

शालेय पोषक आहाराचा लाभ १७ हजार ५६० विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या गावांमध्ये १४० स्वस्त धान्य दुकाने असली, तरी ७२ दुकाने सुरू नाहीत, ती कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ६० संवेदनशील गावांतील शिधापत्रिकांची संख्या २८ हजार ५०० आहे. या शिधापत्रिकाधारकांना गहू, तांदूळ, साखर व तेल या वस्तू २० मे पर्यंत मिळतील. अशा प्रकारे वाहतूक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

*(सौजन्य - दै. सकाळ, १६ मे ९५)*

# खडकीतील आश्रमशाळा, वनतळ्याचे काम सुरू

सातपुड्यातील आदिवासींच्या एकूणच विकासासाठी त्यांची सामाजिक सुधारणा होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करून मुख्यमंत्री मनोहर जोशी, यांनी खडकी (ता. अक्राणी) परिसरात गोवरने सात बालके दगावली असल्याचे सांगितले. या आदिवासींच्या विकासासाठी खास बाब म्हणून खडकी ते तोरणमाळ या रस्त्याचे काम त्वरित हाती घेण्याचे आदेश देऊन येथील मुलांसाठी दोन शासकीय आश्रमशाळा, पाण्यासाठी वनतळ्याचे काम आणि स्वस्त धान्याच्या नियमित पुरवठ्याचे काम आणि स्वस्त धान्याच्या नियमित पुरवठ्याचे काम उद्यापासून सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी आज राज्याचे मुख्य सचिव शरद उपासनी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

खडकी आणि त्यालगतच्या गावांमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून गोवरची साथ पसरली असून, त्यामुळे आदिवासी बालके मोठ्या प्रमाणात दगावली असल्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी आज अचानक जिल्ह्याचा दौरा काढून त्या ठिकाणी भेट दिली.

त्यांच्यासमवेत आदिवासी विकासमंत्री गो. शि. चौधरी, आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर, मुख्य सचिव शरद उपासनी, आदिवासी विकास विभागाच्या सचिव श्रीमती अरूणा बागची, आमदार श्री. विजय गावित, डॉ. नरेंद्र पाडवी, ॲड. के. सी. पाडवी उपस्थित होते.

खडकी येथे आल्यानंतर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी सरळ आदिवासी महिला आणि पुरूषांना भेटून तेथील आरोग्य, अन्नधान्य, पाणी आणि शिक्षणाबाबत संवाद साधला. मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी खडकी, कुंड्या, झापी, फलाई, भादल या गावातील आदिवासी महिला, पुरूष भेटण्यासाठी आले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी आदिवासींना प्रश्न विचारून त्यांच्या समस्यांबाबत माहिती घेतली.

या दुर्गम भागातील आदिवासींच्या विकासासाठी यंत्रणेकडून कुठलीच पावले उचलली न गेल्याने मुख्यमंत्र्यांनी वनविभाग आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना सक्त सूचना दिल्या. पाण्याचे नियोजन होऊन एक महिना झाला तरीदेखील येथे पाणीपुरवठा का होऊ शकला नाही, अशी विचारणा मुख्यमंत्र्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. बोबडे यांना केली. येथील आदिवासी नागरिकांना त्वरित शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी उद्यापासून वनतळ्याचे काम सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

सातपुड्यातील आदिवासींना स्वस्त धान्य पुरेसे आणि नियमित मिळण्यासाठी प्रत्येक गावात स्वतंत्र स्वस्त धान्य दुकाने देण्याची सूचना त्यांनी संबधित विभागाला केली. हे स्वस्त धान्य दुकान त्या गावातील आदिवासीलाच चालविण्यासाठी देण्यात यावे. धान्याच्या वाहतुकीसाठी रस्ते आणि वनविभागाच्या कामातून त्यांना सातत्याने रोजगार उपलब्ध करून द्यावा. हा रोजगार निम्मा धान्याच्या स्वरूपात आणि निम्मा पैशांच्या स्वरूपात दररोज देण्याची सूचना श्री. जोशी यांनी या वेळी दिली.

गोवरमुळे दगावलेल्या बालकांच्या परिस्थितीचे स्पष्टीकरण करताना श्री. जोशी म्हणाले, की गोवरमुळे सात बालके दगावली आहेत.

मुख्यमंत्री जोशी म्हणाले, की पुणे येथील आदिवासी आरोग्य संशोधन केंद्र धुळे येथे कार्यरत करून फायदेशीर ठरणार असेल तर त्याबाबत जरूर विचार केला जाईल.

*(सौजन्य - दै. सकाळ, १८ मे ९५)*


# आदिवासी आणि बांडगुळे

मुंबई आणि राज्याच्या अन्य भागात पावसाळा सुरू झाल्याबरोबर गॅस्ट्रो आणि तत्सम आजारांचे प्रमाण वाढते. पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या वेळीही काही आजार उद्भवतात आणि ग्रामीण भागात त्यामध्ये काही लोक मृत्युमुखी पडतात. आपल्याकडे एकूणच आरोग्यविषयक जागृती फार कमी असल्यामुळे अशा प्रकारांचे गांभीर्य संबधितांच्या लक्षात येत नाही. सरकारी यंत्रणा तर काम करण्यापेक्षा अशा गोष्टी दडपण्यात आपली ताकद वापरते, असाही अनुभव आहे. १९९२ मध्ये ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागामध्ये अशा साथींनी हाहा:कार माजविला होता. त्या जखमा अद्यापि भरलेल्या नाहीत. श्री. सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री असताना हे प्रकार घडले. आणि सरकारी यंत्रणेचे पूर्णपणे वस्त्रहरण झाले. त्यानंतर आदिवासी भागासाठी काही खास योजना जाहीर झाल्या आणि सरकारी यंत्रणा तातडीने राबविता यावी म्हणून काही प्रमुख सरकारी कार्यालये आदिवासी भागात हलविण्याचाही निर्णय घेण्यात आला. त्यांची अंमलबजावणी कितपत झाली याचा शोध घेतला तर हाताला काहीच लागणार नाही. तांत्रिक अडचणी निर्माण करून आणि फाटे फोडून बहुतेक कार्यालये पूर्वीच्याच ठिकाणी कायम ठेवण्याचा सुधारित निर्णय घेतल्याचे यातून दिसून येते.

आदिवासी भागात अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा करण्याची योजना त्यावेळी सुरू झाली. आदिवासी भागासाठी बरेच सवलतीचे दरही निश्चित करण्यात आले. स्वस्त दरात आदिवासींना अन्नधान्य मिळावे आणि भूकबळी पडण्याची नामुष्कीची पाळी येऊ नये, असा विचार त्यामागे होता. पण प्रत्यक्षात आज तेथे उलटी स्थिती आहे. नागपूरच्या विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या काही विद्यार्थ्यांनी या भागात जाऊन केलेली पाहणी आणि त्याचे निष्कर्ष हे दोन्हीही धक्कादायक आहेत.

आदिवासी एकात्मिक विकास योजनेखाली डहाणू तालुक्यातील १८७ स्वस्त धान्य दुकानातून तांदूळ, गहू, साखर आदि आवश्यक वस्तूंचे वितरण व्हावयास हवे. पण प्रत्यक्षात ही स्वस्त धान्याची दुकाने महिन्यातून दोन-चार वेळा उघडतात. जेव्हा ही दुकाने उघडतात तेव्हा तेथे, धान्य किंवा साखर दिसत नाही, पण 'माल संपला आहे' असा फलक तेवढा दिसतो. त्यामुळे आदिवासींना आपला उपाय टाळण्यासाठी खुल्या बाजारातून चढ्या दराने धान्य किंवा साखर घ्यावी लागते. प्रत्येक आदिवासी शिधापत्रकधारकाला दरमहा १५ ते २६ किलो साखर मिळायला हवी. पण एवढी साखर विकत घेण्याची आर्थिक कुवत बऱ्याच आदिवासींमध्ये नाही. त्यामुळे ते साखर घेत नाहीत. पण त्यांच्या शिधापत्रिकांवर मात्र २६ किलो एवढी साखर घेतल्याची नोंद दिसते. बोरिवलीच्या गुदामातून डहाणूला धान्य येते पण नंतर ते दुकानात न जाता इतरत्र विकले जाते. वास्तविक या धान्याची वाहतूक सरकारी मालकीच्या वाहनातून व्हायला हवी. पण केवळ तीन ट्रक त्यासाठी उपलब्ध आहेत, त्यामुळे खाजगी वाहनांचा वापर होतो आणि त्यातूनच त्याची अन्यत्र वाहतूक होते. धान्यसाठा दुकानात येताच स्थानिक दक्षता समितीच्या सदस्यांना बोलावून तलाठ्याने पंचनामा करावा, असा नियम आहे. पण पंचनामा कधीच होत नाही. यामुळे धान्य व साखर आदिवासी भागात गेल्याची नोंद आढळते.

(पान २८ वर)




अरे, एवढं मनाला कशाला लावून घेता. साहेब येऊन गेल्यामुळे रस्ता नाही, निदान हेलीपॅड तरी मिळालं.

# आता नको हुंदके अन् अश्रूही !

आदिवासी भागातील बालके कुपोषणाने मरण पावलेली नाहीत, असे सरकारने विधिमंडळात जाहीर केले हे एका अर्थाने बरे झाले. एका क्षुल्लक गोष्टीवर विधिमंडळात प्रत्येक वर्षी खर्च होणारा वेळ तरी वाचला. आदिवासींचे अश्रू, त्यांची भूक, त्यांची उपेक्षा आणि त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार आदी विषयांवर आता खूप चर्चा झाली. सरकारी तिजोरीतून पैसाही खूप गेला. एवढे होऊनही त्यांच्या आयुष्यात फारसा बदल झाला नाही. याबद्दल मायबाप सरकारला दोषी धरता येणार नाही. सरकार अहवालावर आणि नोकरशाहीवर चालते. अहवालापलीकडेही जग असते, असा दावा करण्यातही अर्थ नाही. नाही तर आतापर्यंत धुळ्यात राहून आदिवासींचे लढे उभारणारे आदिवासी कल्याणमंत्री गो. शि. चौधरी आणि निमआदिवासी जिल्ह्यात राहून समाजकल्याण खाते सांभाळणारे बबनराव घोलप यांना आदिवासी बालकांच्या मृत्यूची नेमकी कारणे कधीच समजली असती. कुपोषणामुळे बालके दगावतात हे आता वेगळे सांगण्याची गरज राहिलेली नाही. कुपोषणाचा फटका बालकांनाही आणि प्रौढांनाही बसतो; पण त्यांना स्वत:ला अहवालात सहभागी करून घेता येत नाही, नोकरशाहीपर्यंत पोचता येत नाही. यात दोष आदिवासींचा आहे, सरकारचा नाही.

मुलांच्या मृत्यूवर विरोधकांनी अधिक प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले, ''या बालकांचे मृत्यू कुपोषणाने झाले नसून अन्य रोगाने झाले आहेत.'' मुख्यमंत्र्यांचेही बरोबर आहे. महाराज घोड्यावरून पडले असे म्हणायचे नसते, त्यामुळे महाराजांनी प्रतिष्ठा कमी होते. त्याऐवजी महाराज घोड्यावरून घरंगळले असे म्हणायचे असते; पण विरोधकांना अशा गोष्टी पटणार कशा? आदिवासी बालकांना रोग झाला नाही, असे एकही वर्ष नसते. शरीराचा सांगाडा झालेली बालके धुळे जिल्ह्याच्या दुर्गम भागात ठिकठिकाणी दिसतात. खायला नसल्यामुळे शरीराचा सांगाडा होतो म्हणजेच कुपोषणामुळे सांगाडा होतो आणि सांगाड्यावर रोग लवकर झडप घालून बालकांचे प्राण घेऊन जातो, असे आदिवासी सांगतील; पण कुपोषणामुळेच मृत्यू झाला हे त्यांना सिद्ध करता येणार नाही.

मुख्यमंत्री जोशी आणि त्यांच्या सहकारी मंत्र्यांनी १७ जूनला आदिवासी भागास भेट दिली होती. आदिवासींच्या आयुष्याच्या चिंध्या पाहून त्यांना गहिवरून आले. आदिवासी कल्याणमंत्री चौधरी यांचेही डोळे पाणावले. गोवराने आदिवासींची बालके मृत्युमुखी पडली, याबद्दल मुख्यमंत्र्यांना खूप वाईट वाटले. त्यांनी हारतुरे स्वीकारण्यास नकार दिला. जागच्या जागीच फर्मान सोडून अनेक कल्याणकारी योजनांची घोषणा केली. आता या गोष्टीला आणखी आठ दिवसांनी दोन महिने होतील. एखाद्याचे डोळे सलग तीस दिवस ओले राहावेत आणि तेही पावसाचा एक थेंब नसतानाही, अशी अपेक्षा करणे बरोबर नाही. पण काँग्रेसच्या लोकांना तसे वाटते; आणि त्यांचीच उत्तरे आज दिली जात आहेत, हेही ते विसरत आहेत. आदिवासींच्या कल्याणाबाबत सर्वच पक्षांना वाटणारी सहानुभूती सारखीच आहे. कार्यक्रमही जवळपास तेच आहेत. प्रत्येकाने प्रसिद्धिमाध्यमांना बरोबर घेऊन त्यांचे अश्रू पुसले आहेत. आता रोज-रोज अश्रू पुसायचे म्हटल्यास ते कोणालाही शक्य होणार नाही. त्यांना अन्य अनेक 'जबाबदाऱ्या' पार पाडावयाच्या असतात. एकाने कोंबडे

झाकले आणि दुसऱ्याने लपवले; पण शेवटी व्हायचे तेच झाले. आदिवासी बालकाची मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका झाली नाही.

आदिवासींच्या कल्याणासाठी किती योजना आहेत, याचा पाढा पुन्हा एकदा वाचण्यात आला. योजनांची नावेसुद्धा अतिशय देखणी. ती उच्चारताच दारिद्र्य पळावे अशी आहेत - संजीवन, नवसंजीवन, आदिवासी विकास वगैरे वगैरे; पण प्रत्यक्षात योजनांच्या अंमल-बाजवणीबाबत लक्ष द्यायला कोणालाच वेळ नाही. धान्यकोष योजना अद्यापही सर्वत्र सुरू झाली नाही. मुख्यमंत्र्यांच्या घोषणाही हवेत विरल्या. आश्रमशाळांतील मुलांना पहिले सत्र संपत आले, तरी पुस्तके आणि गणवेश नाही. बरेच दवाखाने डॉक्टरांऐवजी कंपाऊंडर चालवतात. औषधे कागदोपत्री असतात. जुन्या सरकारने केलेल्या अनेक घोषणाही कागदावरच आहेत.

प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या अनेक आदिवासींना लिहिता-वाचता येत नाही. पण या सर्व गोष्टींसाठी कोट्यवधी रूपये मात्र खर्च झाले आहेत. आता या पैशाचे काय झाले, असा भाबडा प्रश्न कोणी तरी उपस्थित करेल; पण तोही निरर्थक समजायला हवा. पैसे सरकारनेच द्यायचे, कामे होतात की नाही हेही सरकारनेच पाहायचे. या पैशावर आदिवासींचा विकास झाला, की राजकारणातील चेल्यांचा हेही सरकारनेच पाहावे, अशी अपेक्षा करणे गैर आहे. कारण त्याचा काही उपयोग होईल, असे आजवरच्या अनुभवावरून वाटत नाही. आदिवासींची काहीच जबाबदारी नाही का? आदिवासींना जबाबदारीतून सुटका करून घेण्याऐवजी सरकारला एक विनंती करावी. त्यांनी सांगावे, की 'मायबाप सरकार आता आमच्यासाठी हुंदके देऊ नका. निदान जुलै महिन्यात तरी अश्रू ढाळू नका. कारण पावसाळ्यात आसवातला आणि पाण्यातला फरक आम्हाला समजतो कुठे? तुम्ही आमच्या गावात आलात म्हणून आमचे अश्रू तुम्हाला दिसले. ते दाखवण्यासाठी आम्ही मुंबईत थोडेच आलो होतो.' आयुष्याला जखमांचे ठिगळ लावून फिरणे हा आम्हाला शाप आहे. बालकांचे मृत्यू या शापानेच झाले आहेत. आम्ही आहोत तसे अहवालात दिसलो असतो, तर बरे झाले असते; पण आम्हाला अहवाल लिहायला सांगते कोण?

● ● ●

*(सौजन्य - दै. सकाळ, १० जुलै ९५)*

---

(पान २५ वरून)

शिधापत्रिकांवरही वितरणाची नोंद मिळते, पण प्रत्यक्षात दुकानात 'माल नाही' असे फलक दिसतात. आणि आदिवासी उपाशी राहतो. काही व्यापारी, अधिकारी व तथाकथित समाजसेवक यांची बांडगुळे यावर पोसली जातात. पूर्वी विरोधी पक्षात राहून ओरड करणारे लोक आज सत्तास्थानी आहेत. त्यांनी या सर्व प्रकाराची चौकशी करायला हवी, काळाबाजार करणाऱ्यांना शासन करायला हवे आणि आदिवासींच्या पोटातील भूक सरकारी योजनांतून भागेल, अशी व्यवस्था करायला हवी.

● ● ●

*(सौजन्य - लोकसत्ता, २२ जुलै ९५)*

# कुपोषण : समस्या आणि उपाय

**- पुरुषोत्तम आगाशे**

'सर्वांसाठी आरोग्य इ. इ. २००० पर्यंत' ही घोषणा १९७८ साली अल्मा-आटा येथे भरलेल्या जागतिक परिषदेत करण्यात आली. जगातील विकासित तसेच विकसनशील देशांप्रमाणे भारताने देखील ही घोषणा हेच आपले 'लक्ष्य' मानून त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात विकसित देशांच्या बरोबरीने झेप घेण्याऱ्या भारताला आरोग्याच्या क्षेत्रात मात्र हवी अशी प्रगती साधता आलेली नाही ही दुर्दैवाची बाब आहे. स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होत आली तरीही आरोग्य सोयी सुविधांचे जाळे सर्वदूर पसरवण्यात अपयश आले आहे. वर्षाला दहा हजार पेक्षा जास्त डॉक्टर वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडत असताना देखील खेड्यापाड्यातील जनसमुदाय अजूनही आरोग्य सेवेपासून वंचितच आहे. याचीच परिणीती म्हणून आज बालमृत्यू तसेच मातामृत्यूंचे प्रमाणदेखील खूप असल्याचे आढळते देशातील लाखो बालकांचे जुलाब, गोवर, न्युमोनिया व श्वसनसंस्थेचे विकार यासारख्या किरकोळ आजारामुळे मृत्यू ओढवतात. हे मृत्यू साध्या सोप्या उपायांनी सहजपणे टाळता येऊ शकतात.

महाराष्ट्रासारखे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य देखील या स्थितीस अपवाद नाही. जरी जननदर व बालमृत्यूंचे प्रमाण इतर राज्यांपेक्षा कमी असले तरी कुपोषणासारख्या समस्या वारंवार उद्‌भवतच राहिल्या आहेत. १९८७ साली बामणी, १९८९ साली वडफळी (अक्कल कुवा, धुळे) १९९२ वावर वांगणी (जव्हार, ठाणे) १९९३ धारणी (अमरावती) १९९५ तोरणमाळ (अक्राणी, धुळे) इथे घडलेल्या बालमृत्युंमुळे ही गोष्ट अधिकच ठळकपणे जाणवते. वरील ठिकाणी घडलेले बालमृत्यु कुपोषणाने होते का भूकबळी वा अन्य साथीच्या रोगांची शिकार या विषयावर सरकार तसेच विरोधकांमध्ये दावे-प्रतिदावे यांनी वाद रंगले. मृत्यु पावलेल्या बालकांच्या आकड्यांबद्दलही खेळ चालूच राहिले. मात्र काहीही असले तरी कुपोषणामुळे मृत्यू हे विदारक सत्य आहे.


तात्पुरती मलमपट्टी करुन हा प्रश्न सुटु शकणार नाही. यावर मात करण्यासाठी दळणवळण, शिक्षण, आरोग्य, शेती आदि महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये समन्वय साधून व्यापक अशी योजना करुन राबवली पाहिजे मात्र हे सर्व करण्यासाठी ठाम राजकीय निर्धाराची गरज आहे.

आपण कुपोषणाबद्दल बरेच वेळा वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन वरुन वाचत ऐकत असतो. पण हे कुपोषण म्हणजे नक्की आहे तरी काय ? ते कशामुळे उद्‌भवते ? कोणकोण कुपोषणाची शिकार होऊ शकतात? कुपोषणातून बरे होण्यासाठी तसेच टाळण्यासाठी काय काय उपाय केले पाहिजेत याची माहिती आता आपण करुन घेऊ.

कुपोषणाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

कुपोषण म्हणजे, शरीराच्या पोषणासाठी आवश्यक असणाऱ्या एक किंवा अधिक अन्नघटकांच्या अभावामुळे निर्माण होणारी शारिरीक स्थिती.

कुपोषणाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील प्रथिने तसेच उष्मांक / ऊर्जा यांच्या अभावाने होणारे कुपोषण सर्वात जास्त प्रमाणात आढळून येते. योग्यउपचार न केल्यास त्यामुळे मृत्यूसुद्‌धा ओढवतो याशिवाय जीवनसत्व व खनिजे यांच्या अभावाने सुद्‌धा कुपोषण



कुपोषित मूल    सुदृढ मूल

## कुपोषणाची सुरूवात

जेव्हा मुलास त्याच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा कमी अन्न (आणि अन्नघटक) मिळते तिथपासून कुपोषणाची सुरवात होते. कमी अन्न खाल्याने शरीराच्या वाढीवर परिणाम होतो. मुलाला खेळण्यासाठी तसेच नवनविन गोष्टी आत्मसात करण्यासाठी शक्ती राहू शकत नाही. संसर्गजन्य रोगांविरुद्ध लढण्यासाठी लागणारी प्रतिकार शक्ती कमी होते.

कमी पोषण झालेल्या मुलामध्ये फारशी शक्ती नसते. मूल खेळण्यामध्ये उत्साह दाखवत नाही. तसेच आजूबाजूला चाललेल्या हालचालींबद्दल काहीही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. अशा मुलाची झोपही बरीच असते. कमी पोषण झालेल्या मुलांच्या आहारात सुधारणा झाली तर बहुतेक वेळा त्यांच्या शरीराची झालेली झीज भरून निघून वाढ योग्य प्रमाणात होते.

## संसर्गजन्य रोग आणि प्रतिकारशक्ती

संसर्गजन्य रोग आणि कुपोषण यांचा अगदी जवळचा संबंध आहे. म्हणून आपण त्यांची माहिती करुन घेऊ- संसर्गजन्य रोगाची लागण म्हणजे भोवतालच्या परिसरात आढळणाऱ्या जिवाणू, विषाणू यांनी मानवाच्या शरीरावर केलेला हल्ला. त्यामुळे माणूस आजारी पडतो. गोल कृमी तसेच अन्य प्रकारच्या कृमींमुळे सुद्धा आजार उद्भवू शकतो.

शरीरात शिरणाऱ्या सर्वच जिवाणू, विषाणू पासून रोगांची लागण होऊन आपण आजारी पडू शकत नाही कारण :

- निरोगी त्वचेमुळे रोगजंतूंना शरीरात शिरण्यापासून केला जाणारा प्रतिबंध
- पांढऱ्या पेशी आणि प्रति जैवके यापासून लाभणारी

प्रतिकार शक्ती.

जर मूल निरोगी व सुदृढ असेल तर रोगजंतूंनशरीरात प्रवेश करुन वाढ करणे कठिण असते. यदाकदाचित अशा रोगजंतूंनी शरीरात प्रवेश केलाच

तरी शरीराच्या प्रतिकारशक्तीमुळे त्यांच्याशी लढा देऊन काही गंभीर आजार उद्‌भवण्याअगोदरच विजय मिळवला जातो. अशा वेळेस मूल थोड्या काळापुरते अशक्त बनते मात्र लगेचच त्यातून बरे होते.

मूल जर का कुपोषित असेल तर रोगजंतूंना प्रतिबंध व प्रतिकार करणे अवघड ठरते आणि म्हणूनच निरोगी मुलापेक्षा कुपोषित मूल सहजपणे संसर्गजन्य रोगांची शिकार होते.

वयाच्या सहाव्या महिन्यापासून ते तीन वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना बरेच संसर्गजन्य रोग होऊ शकतात. त्यापैकी सर्दी खोकला, मलेरिया यासारखे आजार सामान्य (योग्य आहार असलेल्या) मुलांना तसेच कुपोषित मुलांना सारख्याच प्रमाणात होऊ शकतात. मात्र कुपोषित मुलांमध्ये हे आजार जास्त गंभीर स्वरुप धारण करतात तसेच आजारातून पूर्णपणे बरा होण्याचा काळ देखील सामान्य मुलांपेक्षा अधिक असतो. जुलाब आणि न्युमोनियासारखे आजार कुपोषित मुलांमध्ये जास्त सहजपणे आढळून येतात तसेच त्यांचे स्वरुपही गंभीर असते.

कुपोषित मुले बहुधा गरीब कुटुंबातीलच असतात. तसेच दाटीवाटीने बांधलेली घरे, अस्वच्छता यासारख्या पार्श्वभूमीवर राहतात. सहाजिकच त्यांना संसर्गजन्य रोगांना अधिक प्रमाणात सामोरे जावे लागते.

**कुपोषण आणि आजार : एक दुष्टचक्र**

**कुपोषणाने बळावणारा आजार**

- कुपोषित मुलाचे शरीर सुदृढ आणि निरोगी नसल्याने रोगजंतूना फारसा काही प्रतिबंध न होता शरीरामध्ये सहजपणे प्रवेश मिळणे शक्य होते.
- शरीरामध्ये पांढऱ्या पेशी व प्रतिजैवके जीवाणूंशी लढा देण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे रोगजंतूंची वाढ झपाट्याने होते.
- कुपोषित मुलामध्ये साधा आजारसुद्धा गंभीर स्वरुप धारण करतो उदा. सर्दी, खोकला झाला असेल तर त्यापासून न्युमोनिया होण्याची शक्यता जास्त असते.
- सामान्य मुलापेक्षा कुपोषित मूल आजारामुळे मृत्यू पावण्याची शक्यता जास्त असते. उदा. जुलाब, गोवर, न्युमोनिया यासारखे आजार
- आजारातून उठण्यासदेखील बराच कालावधी लागतो. कुपोषण झालेल्या मुलामध्ये शरीराची झालेली झीज हळूहळू भरुन काढली जाते.

## आजारामुळे आहारावर होणारा परिणाम

- आजारामुळे मुलाची भूक मंदावते आजारपणात नेहमीपेक्षा कमी अन्न खाल्ले जाते.
- आजारी मुलाला जर का घसा अगर श्वसनसंस्थेचे विकार झाले असतील तर नेहमीचा आहार घेणे देखील कठिण होऊन बसते सहाजिकच नेहमीपेक्षा कमी अन्न खाल्ले जाते. कधी कधी केवळ द्रव पदार्थ घेणेच शक्य होते. अर्थातच याचा आवश्यक असलेल्या अन्नघटकांचा सेवनाव परिणाम होतो.
- आजारामध्ये अन्नघटकांची अधिक जरुरी असते. उदा. तापामध्ये, ऊर्जा / उष्माकांची गरज असते तर गोवर झालेल्या मुलास 'अ' जीवनसत्त्वाची अधिक आवश्यकता असते.
- आजारामध्ये कमी अन्न (व अन्नघटक) खाल्ले जाते. परंतु शरीराची गरज त्यामुळे पुरी होऊ शकत नाही. आजारपणात शरीरात साठवलेल्या चरबीचा वापर केला जातो. त्यामुळे मुलाचे वजन घटते, मूल कृश

होते तसेच त्याची वाढही खुंटते.

गोवर, डांग्या खोकला, क्षयरोग, न्युमोनिया अतिसार, मलेरिया यासारख्या गंभीर स्वरुपाच्या आजारात मुलाचे वजन झपाट्याने कमी होते. त्यामुळे असे मूल कुपोषित होते.

**कुपोषण आणि आजार यांचा एकत्रित परिणाम**

आजारपणामुळे ज्यावेळेस मुलाच्या आहाराची गरज वाढलेली असते त्याचवेळेस मुलाचा आहार कमी होतो. जर मुलाने आजारपणात तसेच बरे होत असताना आवश्यक आहार घेतला नाही तर घटलेले वजन भरुन निघू शकत नाही. मूल कुपोषित होते.

मुलाला जर का सतत आजार होत राहिले तर एका आजारात झालेली वजनाची घट भरुन निघेपर्यंत दुसरा आजार होत असल्याने आजारातून बरे होण्यास तसेच वजन पुन्हा भरुन काढण्यास खूप काळ लागतो. जर आजार होतच राहिले तर प्रकृती खालावत जाऊन मृत्यू ओढवतो.

मुलाला तीन वेगवेगळ्या स्तोत्रांमधून अन्नघटक मिळतात.

१) गर्भावस्थेत असताना नाळेतून

२) अर्भकावस्थेत मातेच्या दुधातून

३) बाल्यावस्थेत भरण पोषण करणाऱ्या आहारातून

या स्त्रोतापासून मिळणाऱ्या अन्नघटकांमध्ये काही तफावत आली तर मुलाचे पोषण योग्य रीतीने होत नाही, वाढ खुंटते आणि त्याची परिणीती कुपोषणांत होते.

**आपण आता वेगवेगळ्या वयांगटातील मुलांना होणाऱ्या कुपोषणाची कारणे पाहू -**


**जन्माआधी वाढ खुंटणे**

जन्माच्यावेळी मुलाचे वजन अडीच किलो असावे असे सर्वसाधारण प्रमाण मानले जाते. यापेक्षा कमी वजन असलेले मूल निरनिराळ्या आजारास, योग्य वजन असलेल्या मुलापेक्षा लवकर बळी पडते. वयाच्यां चौथ्या पाचव्या वर्षापर्यंत अशी शक्यता जास्त असते. कमी वजनांच्या मुलांमध्ये 'अ' जीवनसत्व यासारख्या अन्न घटकांचे साठे कमी प्रमाणात आढळतात म्हणून अशी मुले अति कुपोषित होण्याचा दाट संभव असतो.

गर्भावस्थेच्या काळात वाढ खुंटल्याने कमी वजनाची मुले जन्माला येतात. गर्भाची वाढ पूर्ण होण्याआधीच (३८ आठवडे) मूल जन्माला आल्यास त्याचे वजन कमी भरते.

**कमी 'जन्मवजन' असण्याची कारणे**

गर्भारपणात मातेने वाढलेल्या गरजेच्या प्रमाणात आहार घेतला नाही तर गर्भाला पुरेसे अन्नघटक मिळू शकत नाही आणि कमी जन्मवजनाचे मूल जन्माला येते.



**कमी जन्मवजनाचे मूल**

मातेच्या शरीराची वाढ पूर्ण झालेली नसताना गर्भधारणा झाल्यास जन्मणाऱ्या मुलाचे वजन कमी असते.

गर्भारपणात मातेला मलेरिया झाल्यास नाळेवाटे गर्भाला अन्नघटक पुरवण्यामध्ये अडथळा निर्माण होतो. तसेच मातेला ॲनिमियासुद्धा होतो. मुलाचे जन्मवजन कमी भरते.

अनुवंशिक आजार असणाऱ्या मुलांचे जन्मवजन कमी असते.

गर्भारपणात मातेने धुम्रपान अगर मद्यपान केल्यास त्याचा गर्भाच्या वाढीवर तसेच बाळाच्या जन्मवजनावर परिणाम होतो.

### ०-६ महिन्यापर्यंतच्या मुलांमधील कुपोषण

जन्मापासून जर मुलांना स्तनपान दिले तर बहुतेक सर्वांची वाढ योग्य पद्धतीने होते.

माता जर का वरचेवर मुलाला स्तनपान करत राहिली तर दूध पुरेसे निर्माण होते आणि बाळाची भूकदेखील भागते.

मातेच्या दुधामधून सर्व अन्नघटक बाळाला मिळत असल्याने सांसर्गिक आजारांपासून बाळाचे संरक्षण होते. आणि जरी आजार झालाच तरी त्यातून मूल लवकर बरे होते. मूल जर का पूर्णपणे मातेच्या दुधावरच वाढत असले तर आयुष्याच्या पहिल्या सहा महिन्यात कुपोषणाची शक्यता फारच कमी असते.

बाळाला वरचे दूध, भुकटीपासून तयार केलेले दूध बाटलीने पाजले जात असेल तर जंतूंचा संसर्ग होऊन जुलाब, अतिसार तसेच अन्य आजार होण्याची शक्यता अधिक असते. असे आजार वरचेवर होत राहिल्यास कुपोषणाकडे वाटचाल सुरू होते.

### ६ महिने ते १ वर्षाची मुले

मूल सहा महिन्याचे झाल्यानंतर कुपोषणाची शक्यता वाढते. मातेच्या दुधाबरोबरच बाळाला वरचे अन्नही द्यायला सुरवात होते. कधी कधी वरचे अन्न पुरेसे मिळत नाही / पुरेसे होत नाही.

सहा महिन्यानंतर अधिक आजारांना सामोरे जावे लागते. गर्भावस्थेत मिळालेल्या प्रतिजैवकांचा बाळाच्या शरीरातील साठा संपतो. मूल रांगायला लागल्याने सांसर्गिक रोगांची लागण होते. जुलाब हा त्यापैकी प्रमुख आजार, गोवर देखील होऊ शकतो. दुसऱ्या वर्षात प्रवेश करताना आजार व अन्नघटकांच्या कमतरतेमुळे कुपोषण गंभीर रूप धारण करते.

### १-३ वर्षांची मुले

१ ते ३ वर्षांच्या मुलांमध्ये सुद्धा कुपोषणाचा धोका कायम रहातो. बरेचवेळा या वयामध्ये शरीराची वाढ खुंटण्यास प्रारंभ होतो.


उष्मांक/ऊर्जा तसेच अन्नघटक कमी असलेल्या आहाराचे सेवन, शरीराची वाढ होत असताना मिळणारा अपुरा आहार, वारंवार होणाऱ्या आजारांमुळे भूक मंदावणे आदि कारणांमुळे मुलाच्या शरीराची अन्नघटक व उष्मांक /ऊर्जा यांची गरज पूर्ण होऊ शकत नाही.

स्तनपान थांबवल्यावर मुलाला त्याऐवजी योग्य आहार मिळणे आवश्यक असते. जास्त घट्ट अगर जास्त पातळ पदार्थांचे सेवन केल्यास जरूरीएवढे अन्न व अन्नघटक शरीराला मिळू शकत नाही. फलस्वरूप शरीराची होणारी वाढ थांबते.

### ३ ते ५ वर्षांची मुले

वयाच्या तीन वर्षानंतर मूल स्वत:चे स्वत: कुटुंबातील अन्य व्यक्ती खातील तेच अन्न खायला लागते. मुलामध्ये सांसर्गिक आजारांविरूद्ध प्रतिकारशक्ती सुद्धा तयार होते. या वयामध्ये मूल कुपोषित असू शकते जर का :

लहानपणी झालेल्या कुपोषणातून पूर्णपणे बरे झाले




| | | |
|---|---|---|
| दिवसातून दोन वेळेला मऊ, पचनास हलके पदार्थ सुरू करावेत. | इतर पदार्थ हळूहळू द्यायला सुरूवात करावी. साधारणपणे दिवसातून ४-५ वेळा | कुटुंबाचा आहार वाढत्या प्रमाणात देण्यास सुरवात करावी. |

**बाळाचा निरनिराळ्या वयातील आहार**

नसेल . मलेरिया, न्युमोनिया यासारख्या गंभीर स्वरूपाचा अगर क्षयरोग, एडस् यासारखे दुर्धर आजार झाला असेल.

**घरामध्ये अन्नधान्याचा तुटवडा**

अन्नधान्य, भाजीपाला व फळे यांच्या उपलब्धतेनुसार देखील कुपोषणावर परिणाम होतो. उदा. हिरव्या पालेभाज्यांच्या कमतरतेअभावी एखाद्या ऋतुमध्ये 'अ' जीवनसत्त्वाचा आहारात अभाव होऊ शकतो आणि त्यापासून रातआंधळेपणासारखे आजार उद्‌भवतो.

**कृमी**

लहान मुलांमध्ये आढळणारे जंत कुपोषणाला हातभार लावतात. कृमींमुळे दिसणारी लक्षणे पुढीलप्रमाणे -

- भूक न लागणे, त्यामुळे मुलाच्या आहारावर परिणाम होतो.
- जंतांमुळे अन्नघटकांचे पचन तसेच शोषण नीटपणे होऊ शकत नाही.
- प्रथिने, लोह यासारखे अन्नघटक पचनसंस्थेमध्ये नाश पावतात.

वरील कारणांमुळे मुलाचे कुपोषण होते. मुलाला ॲनिमिया होतो. याचा परिणाम म्हणजे मुलांच्या अंगातील शक्ती कमी होते. काम करण्यावर तसेच शालेय प्रगतीवर मर्यादा पडतात. म्हणून मुलाला जंत होऊ न देणे जास्त चांगले. जरी जंत झालेच तरी वैद्यकीय सल्ल्याने जंतावर औषधोपचार करून कुपोषण टाळणे हितावह आहे.

## कुपोषणाचे प्रकार

मुलाला जर का गरजेपेक्षा कमी अन्न मिळते राहिले तसेच वारंवार सांसर्गिक आजार उद्‌भवले तर कुपोषणाची गंभीर समस्या उद्‌भवते. प्रथिने आणि उष्मांक/उर्जा यांच्या अभावामुळे होणाऱ्या कुपोषणाचे प्रकार पुढीलप्रमाणे :

**१ मॅरॅस्मस २. क्वाशिऑर्कर**

**१. मॅरॅस्मस :** अन्न व अन्नघटकांच्या अत्यंत कमी सेवनाने मुलांमध्ये ही समस्या उद्‌भवते. अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आजारापाठोपाठ अथवा नियमितपणे होणाऱ्या सांसर्गिक आजारांमुळे मॅरॅस्मस होतो. वयाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये हा आजार होण्याची दाट शक्यता



मॅरॅस्मस झालेले मूल

असली तरी इतर वयातही होऊ शकतो. खास करून दुष्काळात हा आजार होण्याची शक्यता वाढते. मुलांमध्ये आढळणारी मॅरॅस्मसची लक्षणे पुढीलप्रमाणे :-

**अत्यंत कमी वजन :** कुपोषित मुलाचे समवयस्क सामान्य मुलाच्या वजनाच्या ६० टक्क्यापेक्षा कमी वजन असते. आजारामुळे बराच काळ वजनात वाढ होऊ शकत नाही.

**अत्यंत कृशता :** मॅरॅस्मसचे हे सर्वात महत्वाचे लक्षण आहे. शरीरातील स्नायू तसेच चरबी जवळजवळ नष्ट होते. एकंदरीत शरीर म्हणजे नुसता हाडांचा सापळाच बनते. दंडाचा घेर १० ते ११ से. मी. पेक्षा कमी असतो. (सामान्यपणे दंडाचा घेर १३.५ से. मी. पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे)

**सुरकुतलेला चेहरा** - मॅरॅस्मस झालेल्या मुलाच्या चेहऱ्यावर म्हाताऱ्या माणसाप्रमाणे सुरकुत्या पडतात. चेहेरा नेहमी त्रासलेला दिसतो.

**सुटलेले पोट** - पोटाचे स्नायू कमजोर झाल्याने मुलाचे पोट सुटते.

**इतर लक्षणे** - मूल सतत रडत असते. काही ना काही तरी तक्रारी चालूच असतात.

**भूक** - मुलाला जर कुठलाही आजार नसेल तर ते अधाशीपणे खाते.

## २. क्वाशिऑर्कर

हा एक अत्यंत गुंतागुंतीचा आजार आहे. सर्वसाधारणपणे १ ते ३ वर्षे वयाच्या मुलांमध्ये हा आजार आढळून येत असला तरी अन्य वयातही होऊ शकतो. अन्नघटक तसेच उष्मांक/ऊर्जा यांच्या अभावाने हा आजार होतो.

### क्वॉशिऑर्करची लक्षणे -

आजारातून मूल बरे होत असताना अथवा स्तनपान थांबवल्यावर क्वाशिऑर्करची लक्षणे अचानकपणे दिसू लागतात. मात्र अशी लक्षणे दिसण्याच्या अगोदर काही काळापासूनच मुलाचे पोषण व्यवस्थित न झाल्याने शरीराची वाढ थांबते.

**हात, पाय आणि चेहऱ्यावर सूज** - शरीरावर येणारी सूज हे क्वॉशिऑर्करचे महत्त्वाचे लक्षण. यावरूनच मॅरॅस्मस आणि क्वाशिऑर्कमध्ये फरक करता येतो. सर्वप्रथम पायांवर सूज येते नंतर कुपोषण जसजसे वाढत जाते तसतशी हातावर व चेहऱ्यावर देखील सूज येते. मूल जर झोपून असेल तर पाठीवर देखील सूज येण्याची शक्यता असते. या सूजेचे वैशिष्ट्य म्हणजे अशा भागावर बोटांनी दाबले असता तिथे खड्डा पडतो. ही सूज शरीरातील पेशींमध्ये द्रव पदार्थ साठल्याने येते. आहारामध्ये बदल झाल्यास सूज कमी अथवा जास्त होते.



क्वॉशिऑर्कर झालेले मूल

**चांदोबासारखा चेहरा :** मुलाचा चेहरा नेहमीपेक्षा गोलाकार होतो आणि अधिक गुबगुबीत दिसू लागते. कुपोषणामुळे येणाऱ्या सुजेमुळे हे लक्षण दिसते.

**अन्य लक्षणे :** क्वॉशिऑर्करच्या इतर लक्षणांमध्ये शरीरातील स्नायू कमजोर होतात तसेच त्यांची झीजपण होते. मूल उदास रहाते, आजुबाजूच्या गोष्टींमध्ये सहभाग घेत नाही. भूकसुद्धा जास्त लागत नाही, त्वचेवर परिणाम होतो. हातापायाची साले सहजपणे निघतात, डोक्यावरचे केस विरळ होतात व सहजपणे उपटले जाऊ शकतात. यकृतामध्ये चरबी साठल्याने आकार मोठा होतो. पोटाच्या उजव्या बाजूला वरच्या भागात आकाराने मोठे झालेले यकृत सहजपणे स्पर्शाने ओळखता येऊ शकते.

**मॅरॅस्मस आणि क्वाशिऑर्करमुळे उद्‌भवणारे धोके**

गंभीर स्वरूपाच्या कुपोषणामुळे मुलाचा मृत्यू ओढवण्याचा संभव असतो. अशा मुलांची रूग्णालयामध्ये काळजीपूर्वक देखभाल करणे जरूरीचे असते. खास आहार व औषधांच्या उपचारानंतरदेखील काही मुले दगावतात. कुपोषणाच्या चक्रात सापडून मृत्युमुखी पडतात.

कुपोषणामुळे अत्यंत गुंतागुंतीचे आजार उद्‌भवतात त्यामुळे उपचार करणे अवघड जाते.

सौम्य व गंभीर स्वरूपाचा अतिसार जुलाब, पचनसंस्थेचे इतर आजार न्युमोनिया, सतत कान वहाणे, मूत्रवहनसंस्थेमध्ये जीवाणूंचा संसर्ग, हायपोग्लायसेमिया (शरीराचे तापमान घटणे ) भूक मंदावणे, ॲनिमिया यासारखी लक्षणे कुपोषित मुलांमध्ये आढळतात. हे आजार वारंवार उद्‌भवत राहिल्यास कुपोषण गंभीर स्वरूप धारण करते. म्हणून अशी लक्षणे दिसताच त्यावर तातडीने उपचार करणे हाच कुपोषणावर मात करण्याचा योग्य मार्ग आहे.

आत्तापर्यंत आपण कुपोषण आणि आजार यांचा संबंध, निरनिराळ्या वयोगटात होणारे कुपोषण, त्याची मुख्य लक्षणे वगैरे गोष्टींचा उहापोह केला. याशिवाय देखील कुपोषणाला, वेगवेगळ्या पातळीवरील अनेक गोष्टी हातभार लावत असतात. अशा गोष्टींचा थोडक्यामध्ये परामर्श घेऊ.

**मूल :**

- कमी जन्मवजन
- सतत होत रहाणारे अतिसार, जुलाब, सर्दी खोकला, मलेरिया यासारखे आजार, ज्यामुळे वजन घटते, भूक मंदावते, शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते.
- जंत झाल्यामुळे आहारावर परिणाम होतो.

- आई आणि मुलामध्ये भावनिक संबंधाचा अभाव.
- बाटलीने पाजले जाणारे दूध.

**माता :**

- आई स्वत: कुपोषित अथवा आजारी असणे.
- पाणी भरणे, लाकूडफाटा गोळा करणे, व घरातील इतर कामांमुळे मुलाकडे लक्ष देण्यास वेळ न होणे.
- अर्थार्जनासाठी घराबाहेर कामाला जाणे.
- आई निरक्षर व अडाणी असल्याने चुकीच्या आहार पद्धतीचा वापर.
- आई घटस्फोटित, परित्यक्ता अथवा विधवा असणे.

**कुटुंब :**

- नियोजनाअभावी मोठे कुटुंब
- कुटुंब प्रमुखाचे अपुरे उत्पन्न, व्यसनाधिनता
- घरामध्ये सतत होणारी भांडणे.
- मुलींकडे मुद्दाम केले जाणारे दुर्लक्ष.

**समाज :**

- अपुरी जमीन, बेरोजगारी
- शेतीची मागासलेली पद्धत, जमिनीची धूप, पाण्याचा अभाव
- पडीक जमीन
- दुर्गम भाग, दळवळणाच्या साधना अभावी बाजाराशी कमी संपर्क
- वेठबिगारी, कर्जबाजारीपणा
- जाती, धर्मांमध्ये असलेले वैर

**देश :**

- युद्ध, अशांतता, यादवी संघर्ष, पूर, अवर्षणग्रस्त परिस्थिती
- देशाची गंभीर आर्थिक परिस्थिती परकी चलनाचा तुटवडा
- भ्रष्टाचार, अकार्यक्षम सरकारी यंत्रणा


**कुपोषण कसे मोजावे?**

कुपोषण गावातल्या गावातसुद्धा मोजता येऊ शकते. त्यासाठी खास तज्ज्ञ माणसाची आवश्यकता नसते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गावातील लोकंही हे काम करू शकतात. कुपोषण मोजण्याच्या दोन पद्धती आहेत.

**वजन :**

मुलाचे वजन मोजून कुपोषणाचा दर्जा ठरवता येतो. ही पद्धत अचूक तसेच सहजपणे वापरता येण्याजोगी आहे. मुलांचे वजन घेण्यासाठी वजनकाट्याची आवश्यकता असते. वजनकाटा महाग असतो. तसेच गावामध्ये घेऊन फिरणे जरा त्रासाचेच होते. हे या पद्धतीचे मुख्य दोष.

गावातील प्रत्येक ५ वर्षाच्या आतील मुलाचे दर महिन्याला वजन केले पाहिजे. त्यासाठी गावातलेच एखादे सार्वजनिक ठिकाण निवडता येईल. मूल जर का कुपोषित असेल तर दर आठवड्याला वजन करणे हितावह ठरते.



मुलाचे वजन, उपलब्ध असलेल्या वजन-वय तक्त्यावर नोंदवल्यास मुलाची वाढ नीट होत आहे किंवा नाही हे देखील कळू शकते. अशा वजन-वय तक्त्यावर कुपोषणाचा दर्जा ओळखण्यासाठी संदर्भरेषा काढून प्रमाण ठरविलेले असते त्यावरुन मूल कुठल्या दर्जामध्ये आहे ते तपासता येते व त्याप्रमाणे उपचाराची दिशा निश्चित करता येते. सर्व स्वास्थ केंद्रामध्ये असे तक्ते उपलब्ध असतात.

**दंडाचा घेर**- मुलाच्या दंडाचा घेर मोजून देखील कुपोषण ओळखता येते. त्यासाठी काही परिमाणे ठरवली आहेत.

| कुपोषणाचा दर्जा | दंडाचा घेर |
|---|---|
| योग्य पोषण | १३.५ सें. मी. अथवा जास्त |
| मध्यम | १२.५ - १३.५ सें. मी. दरम्यान |
| गंभीर | १२.५ सें.मी. अथवा कमी |

दंडाचा घेर मोजण्यासाठी टेपचा वापर केला जातो. मुलाला बसवून अथवा उभे करुन डाव्या हाताच्या दंडाचा घेर मोजला जातो. कधी कधी याकामासाठी खास तयार केलेल्या रंगीत प्लॅस्टिकच्या पट्ट्यांचा देखील वापर केला जातो.

नवजात बालकांमध्ये कुपोषण मोजण्यासाठी देखील ही पद्धत वापरली जाऊ शकते. बाळाच्या दंडाचा घेर ८.७ से. मी. कमी असल्यास बाळाचे 'जन्मवजन' कमी असल्याचे समजतात.

ही कुपोषण मोजण्याची पद्धत सर्वात सोपी, व सहज करता येण्याजोगी आहे. कोणालाही वापरता येण्याजोगी ही पद्धत दुर्गम भागात देखील उपयोगी ठरते. मात्र अचुकतेच्या बाबतीत तितकिशी सक्षम नाही. एक वर्ष वयाच्या आतील मुलांसाठी ही पद्धत वापरता येऊ शकत नाही.

**कुपोषण टाळण्याकरता घ्यावयाची काळजी**

काही साधे सोपे नियम पाळले तर मुलांमध्ये आढळणारे कुपोषण सहजपणे टाळता येऊ शकेल, मुलांची वयाबरोबर वाढ देखील योग्य रीतीने होईल.

१. गरोदर मातेसाठी चौरस आहार.

२. स्तनपान

३. चवथ्या ते सहाव्या महिन्यादरम्यान संमिश्र आहार.

४. मुलांना आजारातही योग्य आहार

५. अन्नपदार्थ तयार करण्याच्या, शिजवण्याच्या, आणि साठवण्यासाठी योग्य पद्धतींचा वापर.

**१. गरोदर मातेसाठी चौरस आहार**

मुलाचे जन्मवजन आणि पहिल्या काही आठवड्यातील वजन मातेच्या आरोग्य आणि आहारावरच अवलंबून असते. मुलाचे जन्मवजन २.५ किलो तर दंडाचा घेर ८.७ सें. मी. होण्याच्या दृष्टीने खास प्रयत्न केले पाहिजेत त्यासाठी खालील गोष्टींची काळजी घेतली पाहिजे.

अ) गरोदरपणामध्ये मातेचे वजन योग्य पद्धतीने वाढले पाहिजे. सर्वसाधारणपणे ५ ते ८ किलो वजनाची वाढ बाळाच्या दृष्टीने चांगली असते. गरोदरपणाच्या संपूर्ण काळात योग्य प्रमाणात चौरस आहार आणि शेवटच्या महिन्यात आवश्यक तेवढी विश्रांती यावरच मातेची वजन वाढ अवलूंबन असते.

ब) ॲनिमिया होऊ नये म्हणून अगर झाल्यास योग्य उपचार घेण्याची काळजी घेतली पाहिजे.

मातेच्या रक्तामधील हिमोग्लोबिनचे प्रसुतीच्या वेळी १२ ग्रॅ. अगर त्यापेक्षा जास्त असले पाहिजे. त्यासाठी हिरव्या पालेभाज्या, अंडी यासारख्या भरपूर प्रमाणात लोह, खनिज असलेल्या अन्नपदार्थांचा आहारात अंतर्भाव केला पाहिजे.

ॲनिमिया असल्यास लोहाच्या गोळ्या नियमितपणे घेतल्या पाहिजेत.

मलेरिया, कृमी यासारखे आजार टाळले पाहिजेत. अगर झाल्यास त्यावर तातडीने उपचार केले पाहिजेत.

क) 'अ' जीवनसत्वाच्या कमरतेवर योग्य ती उपाययोजना केले पाहिजेत.

'अ' जीवनसत्वयुक्त अन्नपदार्थांचा आहारात भरपूर वापर. हिरव्या पालेभाज्या, फळे, पाम तेल, आदि पदार्थांच्या सेवनाने 'अ' जीवनसत्व मिळू शकते.

यदाकदाचित 'अ' जीवनसत्वाची कमतरता आली तर बाळंतपणानंतर ४ आठवड्यानंतर 'अ' जीवनसत्वाचा २,००,००० आय. यु. चा डोस द्यावा. मात्र गरोदरपणात याचा वापर टाळावा.

ड) आयोडीनच्या कमतरतेमुळे गलगंड आढळणाऱ्या भागात आयोडीनयुक्त मीठाचाच वापर करावा.

ई) मातेने धुम्रपान, मद्यपान अजिबात टाळले पाहिजे. गर्भारपणात या सवयी चालू राहिल्यास गर्भाची वाढ खुंटते, होणारे मूल अशक्त उपजते व दगावण्याची शक्यता देखील अधिक असते.

फ) क्षयरोग, गुप्तरोग, एडस् यासारखे गंभीर आजार टाळण्यासाठी उपाय केले पाहिजेत.

पहिल्या दोन-तीन दिवसात निघणारा चीक बाळाच्या दृष्टीने अतिशय लाभदायक असतो. त्यामध्ये अन्नघटक तसेच रोगांविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक असणारी प्रतिजैविके असतात. म्हणून पहिल्या दिवसापासून स्तनपान सुरु केले पाहिजे.

**२. स्तनपान**

मूल कमीतकमी सहा महिन्याचे होईपर्यंत स्तनपान चालू ठेवले पाहिजे. स्तनपानाचे अनेक फायदे आहेत.

अ) मातेचे दूध हा बाळाचा नैसर्गिक आहार आहे.



या दुधामध्ये बाळासाठी आवश्यक असणारे सर्व अन्नघटक योग्य प्रमाणात असतात, त्यामुळे बाळाला आजारां विरुद्ध लढण्यासाठी प्रतिकारशक्ती मिळते.

ब) मातेचे दूध सहजपणे उपलब्ध असते.

क) बाळाला स्तनपान दिल्यास अतिसारासारखे सांसर्गिक आजार होण्याची शक्यता खूपच कमी होते.

ड) स्तनपानामुळे आई आणि मुलादरम्यान भावनिक नाते निर्माण होते.

ई) नियमितपणे सतत स्तनपान केल्यास गर्भधारणा होण्याची शक्यता कमी असते. अशा प्रकारे दोन मुलांमध्ये अंतर राखण्यास स्तनपान साह्यभूत ठरते.

**३. चवथ्या ते सहाव्या महिन्यादरम्यान संमिश्र अहार:** सहाव्या महिन्यानंतर मुलाला मातेचे दूध कमी पडू लागते म्हणून वरचे अन्नपदार्थ मुलाला सुरु करताना काळजी घेतली पाहिजे चवथ्या-पाचव्या महिन्यानंतर हळूहळू स्तनपानाबरोबर द्रव पदार्थ द्यायला सुरवात केली पाहिजे. असा आहार सुरु करताना पाळावयाच्या काही गोष्टी.

मुलाला प्रत्येक वेळी थोडा थोडाच आहार दिवसातून दोन वेळा द्यावा.

आहारामध्ये मऊ आणि पचनास हलक्या पदार्थांचाच

फळे, पालेभाज्या द्यायला सुरवात करावी. दिवसातून ३ ते ४ वेळा खायला द्यावे.

एक वर्षानंतर कुटुंबातील इतर व्यक्ती जे पदार्थ खातील तेच पदार्थ मुलासही द्यावेत मात्र मुलाला पुरेसा आहार व अन्नघटक मिळतील याची काळजी द्यावी. त्यासाठी मुलाला दिवसातून ४ ते ६ वेळा खायला द्यावे. म्हणजे शरीराची वाढ सामान्यपणे होऊ शकेल.

**४. मुलांना आजारतही योग्य आहार :**

आजारी असलेल्या मुलांना आहार देऊ नये हा समज घातक ठरु शकतो कारण त्यामुळे मुलाचा मृत्यु देखील ओढवू शकतो. आजारामुळे कुपोषण होते आणि कुपोषणामुळे आजार बळावतो असे हे दुष्टचक्र आहे. जोपर्यंत मूल खाण्यास नकार देत नाही अगर अन्न उलटून पडत नाही तोपर्यंत मुलांच्या आहार चालू ठेवला पाहिजे.

आजारी मुलाची भूक मंदावलेली असते म्हणून त्यांना पाहिजे ते अन्न थोड्या थोड्या प्रमाणात दिले पाहिजे.

जुलाब होत असताना देखील मुलांचा आहार चालू ठेवला पाहिजे शरीरातील द्रवपदार्थांचे प्रमाण कमी झाल्याने मूल अशक्त होते अशावेळेस भाताची पेज अगर तत्सम पातळ पदार्थ उपयुक्त ठरतात.

**५. अन्नपदार्थ तयार करण्याच्या शिजवण्याच्या आणि साठवण्याच्या योग्य पद्धतींचा वापर :** अन्नपदार्थ तयार करताना, शिजवताना, व साठवून ठेवताना अत्यंत स्वच्छता राखली पाहिजे. ज्यायोगे सांसर्गिक आजारास कारणीभूत ठरणारे जीवजंतू अन्नावाटे मुलांच्या शरीरात प्रवेश करु शकणार नाहीत.

स्वयंपाक करण्याआधी हात स्वच्छ धुतले पाहिजेत. नखे कापलेली असावीत, नखांत मळ साचू देऊ नये.

स्वयंपाकासाठी स्वच्छ पाण्याने घुतलेल्या भाड्यांचा वापर करावा.

फळे, भाज्या धुताना स्वच्छ पाण्याचाच वापर करावा, अन्न ठराविक वेळेपर्यंतच शिजवावे. जास्त वेळ शिजवल्यास त्यातील जीवनसत्वांचा नाश होतो.

कौटुंबिक पातळीवर वर दिलेले उपाय करता येण्याजोगे आहेत. याचबरोबर सामाजिक पातळीवर देखील कुपोषणरुपी राक्षसाचे निर्दालन करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१. कुपोषणग्रस्त भागात आहार योजना

२. गरीब कुटुंबाचा आर्थिक स्तर सुधारुन क्रयशक्ती वाढवण्यासाठी त्यांना रोजगार, शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

३. सर्व गावे रस्ते, दळवळणाच्या सोयींनी जोडले गेले पाहिजेत.

४. गावापातळीवर स्वच्छ पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता सांसर्गिक रोगांचे निर्मूलन, आरोग्य शिक्षण, आदि योजनांद्वारे जनजागृती.

५. पारंपारिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीमध्ये सुधारणा करुन अधिक उत्पादन देण्याऱ्या जाती, चांगली पोषणमूल्ये व अधिक अन्नघटक देणारी पिके यावर भर.

६. कडधान्ये, तृणधान्ये, तेलबिया, नगदी पिके, यांच्या उत्पादनाचे योग्य प्रमाणात नियोजन.

७. गरीब कुटुंबांना रास्त दराने धान्य पुरवठा.

कुपोषणाचे संकट व त्यापासून ओढवणारे मृत्यु टाळण्यासाठी कौटुबिक पातळीपासून देश पातळीपर्यंत सर्व स्तरावर लढा देण्याची गरज आहे. त्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कुपोषणापासून मुक्तता ही गोष्ट अवघड जरी असली तरी खचितच आवाक्यातली आहे. योग्य रीतीने मुलांचे संगोपन, संवर्धन करुन त्यांना सक्षम नागरीक बनण्यासाठी तसेच 'सर्वांसाठी आरोग्य इ. स २००० पर्यंत ही घोषणा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करु या.

● ● ●

# सूची

| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सत्तावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |
| अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९४ - आदिवासी जमाती |
| अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून | १९९५ - राणीपूर विशेषांक |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune - 30.